# शहराची कारभारीण

नगरसेविका व राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करू पाहणाऱ्या महिलांसाठी...

अंक तिसरा, क्रमांक-३, मार्च २०१३ (खाजगी वितरणासाठी)



जगणं
असुरक्षित
रोखणार
कोण?
आपण सगळे
आणखी कोण!

टाटा सामाजिक विज्ञान संस्था
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था
महाराष्ट्र महिला परिषद




।। कारभारणींचा नवा दागिना, ताठ मान-ताठ कणा ।।

# मानपत्र

आज आम्ही,

माननीय **श्रीमती अस्मिता चौधरी**

राहाणार भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांना नगरसेविका म्हणून हे मानपत्र सन्मानाने देत आहोत.

लोकप्रतिनिधी या नात्याने आपण लोकहिताचे राजकारण मनापासून करीत आहात. महिलांसह गरीबाला सन्मानाने जगता यावं, हे ध्येय तुम्ही समोर ठेवले आहे. विरोधकांसह सर्व मतदारांशी तुम्ही जिव्हाळयाचा व्यवहार ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहात.

धर्म, जात, लिंग, भाषा, वर्ग हे भेद मतदारांसाठी काम करत असताना आड येत नाहीत. समतेचे उद्दीष्ट ठेवून तुम्ही सामाजिक कार्य करीत आहात.

इतकेचं नव्हे तर मतदारसंघाला योग्य न्याय मिळावा, म्हणुन तुम्ही स्वतःच्या कारभार क्षमता वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहात.

छोटे-माठे यश व अपयश पचवत तुम्ही विकासाचा नवा पत्ता - अर्ध्या महिला अर्धी सत्ता ही घोषणा आपण सार्थ ठरवाल अशी अपेक्षा आहे. स्थानिक लोकशाहीवर तुमचा विश्वास असून ती बळकट करण्यासाठी तुमचे प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास वाटतो.

तुमच्या या निःस्वार्थी योगदानाकरीता हे मानपत्र देताना आम्हाला आनंद होत आहे. तुमच्या या कष्टपूर्वक व सातत्याने टिकून राहण्याच्या या प्रयासाला आमचा निरंतर पाठिंबा व शुभेच्छा !

महाराष्ट्र महिला परिषद

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

टाटा समाज विज्ञान संस्था

दिनांकः मार्च २००१३ स्थळः मुंबई

## ‘सन्मान कारभारणीचा’

# श्रीमती अस्मिता चौधरी यांचा परिचय

श्रीमती अस्मिता चौधरी या भिवंडी - निजामपूर महानगरपालिकेत २०१२ साली दुसऱ्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. २००७ साली शिवसेने तर्फे तर २०१२ साली भारतीय जनता पक्षा तर्फे त्यांनी निवडणूक लढविली. महिला बाल विकास समिती आणि स्थायी समितीच्या सदस्या म्हणून त्यांनी महानगरपालिकेत काम केले.

राजकारणात येण्याची प्रेरणा आपले सासरे स्वर्गीय हरिश्चंद्र शंकर चौधरी यांच्याकडून आपणास मिळाली. कारभारातील प्राथमिक धडे त्यांनी शिकविले. आपले दीर श्री. निलेश चौधरी (नगरसेवक) आणि पती श्री. राजेश चौधरी यांच्या सहकार्याने व सक्रीय पाठिंब्यांमुळे आपण सक्षमपणे व पुढाकार घेऊन स्वतः काम करू लागलात. विचार, व्यवहार, आणि जनसंपर्काची कामे याची नीट सांगड घातलीत.

हे काम करतांना फक्त स्वतःच्या वॉर्डापुरता नव्हे तर भिवंडी महानगरपालिका हद्दी मधील विकासाचा विचार आपण करता. आपल्या वॉर्डात लोकांच्या सोयीनुसार पाण्याचे वेळापत्रक आपण बसवून दिले. याच बरोबर भिवंडी म.न.पा. मध्ये येऊ घातलेल्या पाण्याच्या खाजगीकरणाबाबतची मांडणी आपण विश्लेषणात्मक पध्दतीने करता. महानगरपालिकेने पाणी पुरवठा केल्यास लोकांची गरज भागविणे हा त्यामागील हेतू असेल मात्र पाण्याचे खाजगीकरण झाल्यावर खाजगी कंपनीचा हेतू नफा मिळवणे हा असेल, ही स्पष्टता आपल्याला आहे.

भिवंडी येथे महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे, शौचालये व्हावीत यासाठी आपण प्रयत्नशील आहात. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था व सांडपाणी निचरा करण्याची व्यवस्था हे प्रश्न आपण अग्रक्रमाने हाती घेतले आहेत.

आपल्या वॉर्डात महिलांसाठी अनेक उपक्रम आपण सक्षमपणे राबविले आहेत. लघुउद्योगांसाठी महिलांना म.न.पा. कडून योजनांतर्गत अर्थसहाय्य आपण मिळवून दिले आहे. महिलांचे बचत गट बांधण्यात तुम्ही पुढाकार घेता. आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबिरे व जनसेवा प्रशिक्षण कोर्स चालविणे असे  समाजपयोगी कार्यक्रम आपण राबविले आहेत. लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविण्यात आपण सातत्याने लक्ष घालता.

आपल्या विभागातील युवा वर्गाशी संवाद साधणे, कौटुंबिक प्रश्न सोडविणे, त्यात आपला पुढाकार असतो. नागरी सुविधा पुरविण्या बरोबर लोकप्रतिनिधी म्हणून याही कामाला आपण महत्व देता.  आपल्याला म.न.पा. कारभाराची जाण व प्रश्नांची माहिती असल्यामुळे गट नेत्यांशी चर्चा करून वॉर्डातले प्रश्न सभागृहात सातत्याने आपण मांडता. नवीन शिकण्याची इच्छा आणि चौकस वृत्तीमुळे टेंडर भरण्यापासून लोकप्रतिनिधी प्रशासक यांचे संबंध वा वीजेच्या खाजगीकरणाबद्दल आपण तपशीलवार माहिती देता.

याच बरोबर लोकसभा, विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे या बाबत आग्रहपूर्वक आपण मांडणी करता. जिथे कायदा बनतो तिथे महिलांचे संख्या बळ वाढले तरच चित्र बदलेल, असा आपण विश्वास बाळगता.

महिलांनी सक्षम झाले पाहिजे. स्वतःच्या मतांना प्राधान्य दिले पाहिजे याचा आग्रह आपण धरता.

**- भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

### श्रीमती अस्मिता चौधरी यांनी कारभारणींसाठी मांडलेली पंचसूत्री :

‘विभागातील छोटी-मोठी कामें करण्याबरोबरच वाचन, बातम्या, स्व शिक्षण, लोकांशी संपर्क व लोकांचे प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे.

❒❒❒

**डॉ. जतीन मोदी**
अध्यक्ष, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादक**

**रणजीत चव्हाण**
महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादकीय मंडळ**

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
संचालिका, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**डॉ. (प्रा.) अमिता भिडे**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

**नीला लिमये**
महाराष्ट्र महिला परिषद

**भीम रासकर**
महिला राजसत्ता आंदोलन

**सीमा काकडे**
प्रयास, पुणे

**संपादक / प्रकाशक**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था,
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
महाराष्ट्र महिला परिषद, मुंबई

**संपर्क**
**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
एम.एन.रॉय मानव संसाधन संकूल प्लॉट नं. ६,
एफ ब्लॉक, शासकीय वसाहती समोर,
इमारत क्र. ३२६, समोर, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६५७३७९५ / ९६
फॅक्स : २६५७ ३९७३

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**
**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज
व्ही. एन. पुरव मार्ग, देवनार,
मुंबई - ४०० ०८८.
दूरध्वनी क्र.: ०२२-२५५२५३७५ / ७६

**महाराष्ट्र महिला परिषद**
**भारती शर्मा**
श्रमिक, रूम नं. ९३२/९३३/५५१
डी मार्ट च्या मागे, राजपाल हॉस्पिटल समोर,
सेक्टर - ७, कोपरखैराणे, नवी मुंबई -
४००७०९
दूरध्वनी क्र.: ०२२-२७५४४२१९ /
२७५४८२१२

**मुखपृष्ठ**
श्री. मुकुंद सावंत, टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**अंक जुळणी व मुद्रण**
एन.एस.डी. आर्ट, अंधेरी, मुंबई
२८३९३४५० / ५१

***नोंद* : सदर अंकातील लेख हे लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक / संपादक मंडळ / प्रकाशक आणि संबंधित तीनही संस्था लेखात दिलेल्या मतांशी सहमत असतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.**

## ‘संपादकीय’

# महिला सुरक्षा

महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराचा प्रश्न गेल्या तीन-चार महिन्यांत ऐरणीवर आला आहे. घरात पित्याने - भावाने धाकाने मुलीवर केलेला बलात्कार, लहान मुलींवर तिच्या घराशेजारी राहणाऱ्या किंवा कोणी नातेवाईकांनी केलेले बलात्कार आणि हत्या, दिल्लीत झालेल्या सामूहिक बलात्काराची घटना अशा मनाच्या थरकाप उडवणाऱ्या बातम्यांनी समाजाला धक्के दिले आहेत. मुलगी स्वतःच्या घरात सुरक्षित नसेल तर आणखी सुरक्षितता कुठून आणायची असा प्रश्न बहुसंख्यात स्त्रियांच्या मनात नक्कीच उभा ठाकला असेल.

मार्च महिन्यातील हा अंक महिलांच्या सुरक्षिततेबाबतचा मुद्दा डोळयांसमोर ठेवून तयार केला आहे.सुरक्षिततेबाबत विचार करताना कुटुंबांतर्गत सुरक्षितता, कामाच्या ठिकाणची सुरक्षितता, सामाजिक-राजकीय जीवनातील सुरक्षितता अशाप्रकारे बघावी लागेल.

कुटुंबाअंतर्गत असणाऱ्या नात्यांमध्ये नवरा-बायको, पालक आणि मुली, सासरची मंडळी आणि मुली, बहिण भाऊ अशा नात्यांमध्ये मुलींना सुरक्षितता वाटावी यादृष्टीने कायद्यात अनेक गोष्टी आहेत. उदा. अल्पवयीन मुलांनाही त्यांच्या इच्छे विरूध्द त्यांचे पालक घरात ठेवू शकत नाहीत. ही मुले पालकांविरूध्द पोलिस ठाण्यात जाऊ शकतात. महिला ४९८ (अ) कलम वापरून non-compoundable दखलपात्र गुन्ह्याची नोंद पोलिस ठाण्यात करू शकतात, कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्यामुळे त्यांचा घरात राहाण्याचा अधिकार आणि वेगाने समस्या सुटण्याच्या दिशेने पाऊले टाकणे या गोष्टी घडू शकतात...पण तरीही कुटुंबाअंतर्गत महिलांवरील अत्याचार संपुष्टात आलेले नाहीत. लैंगिक अत्याचार होतात तेव्हा तर बहुसंख्य घटनांमध्ये नातेवाईकांपैकी किंवा अतिशय जवळच्या परिचितांपैकी कोणीतरी दोषी आहे, असे आढळून येते.

कामाच्या जागी सुरक्षिततेचे वातावरण निर्माण व्हावे यादृष्टीने प्रत्येक कार्यालयात / कामाच्या ठिकाणी विशाखा कमिटी निर्माण करणे आज बंधनकारक आहे. सामाजिक - राजकीय सुरिक्षतता निर्माण व्हावी याकरिता जिल्हा पोलिस ठाण्यामध्ये पारिवारिक समस्यांकरिता वेगळे महिला कक्ष, मुंबई सारख्या ठिकाणी कार्यक्षमपणे चालणारी 103 help line, पोलिस ठाण्यांमध्ये महिला दक्षता समित्या, महिला पोलिस पाटील आणि महिला ग्रामसेविका या जागांकरिता ३० टक्के आरक्षण, ग्रामसभे आधी महिलांची ग्राम सभा होणे, ग्रामपंचायतीत महिलांवर येणारा अविश्वास ठराव २/३ ऐवजी ३/४ संख्येने असेल तर मंजूर होणे इत्यादी बाबी गेल्या काही वर्षात झाल्या आहेत. याखेरीज महिला आयोग, state social welfare board यासारख्या आवश्यक व्यासपीठांची, मंडळांची निर्मिती, त्यांच्या माध्यमातून चालणारे उपक्रम, अभ्यासगट अशा अनेक गोष्टी आज उपलब्ध आहेत.

तरीही महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे घडत आहेत. मुलींवर एकतर्फी प्रेमातून होणारे हल्ले, त्यात acid चा केला जाणारा वापर हेही आजचे वास्तव आहे. राजकारणात प्रवेश करू इच्छीणाऱ्या या महिलांची संख्या वाढते आहे. त्याचवेळी स्वतंत्रपणे विचार करू शकणाऱ्या महिलांना विविध प्रकारे अडथळा करण्याचे प्रयत्नही होत आहेत.

बलात्कारासारख्या घटना घडतात तेव्हा आपल्याला आणि समाजालाही हतबल झाल्यासारखे होते. या घटना बरेचदा वैयक्तिक पातळीवर आणि क्वचित सामुदायिक पातळीव घडलेल्या असतात. एखाद्या व्यक्तिची अशी मानसितका का निर्माण होते ? काही जण म्हणतात की महिलांचे बदललेले पेहेराव हे त्याचे कारण आहे, हे जर खरे मानले तर चार - पाच वर्षाच्या मुली किंवा साठ पासष्ट वर्षाच्या महिला यांच्यावर बलात्कार कां होतात ?

ज्या सांस्कृतिक - सामाजिक परिस्थितीत ही मानसिकता निर्माण होते आहे ती परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कमी काळात झपाट्याने वाढणारी शहरे, एकाबाजूला मुलामुलींना अधुनिक काळात मिळणारा मोकळेपणा, शिक्षण नोकरी यानिमित्ताने एकत्रित काम करणे, व्यवहार करणे याला समाजाची वाढती मान्यता. पण त्याचवेळी परंपरांची जातीधर्माची ओझी, यातून होणारी घुसमट, मुलगा हा वंशाचा दिवा याचा समाजावर असलेला पगडा, त्यामुळे कोणाकडूनही कोणत्याही बाबतीत नकार ऐकण्याची सवय नसणे... या सगळयाच्या परिणामी ही विकृत मानसिकता तयार होत असावी. या मानसिक विकृतीशी लढणे आणि या विकृतीला जन्म देणारी परिस्थिती बदलण्याकरिता पाऊले उचलणे हे आपल्या पुढील मोठे आव्हान आहे.

शहरी कारभारणी त्यांच्या प्रभागात यादृष्टीने काही उपक्रम राबवू शकतात. उदा. आपल्या प्रभागातील ‘महिला दक्षता समिती’ महिला सुरक्षिततेच्या दृष्टीकोतून अधिक नीटपणे काम कसे करू शकेल याबाबत प्रयत्न करणे.

मुंबई सारख्या शहरात 103 help line ची माहिती देण्याकरिता ठिकाठिकाणी फलक लावणे. विभागात नवीन कोणी रहायला आल्यास तेथील सोसायटीला त्याची नोंद ठेवण्याचा आग्रह करणे.आपल्या प्रभागात औद्यौगिक किंवा सेवा क्षेत्र असल्यास तेथील उद्योगात विशाखा समिती स्थापन झाली आहे याची पाहणी करणे.स्थानिक पातळीवर अशा रीतीने प्रयत्न केले तर महिलांना सुरक्षितता मिळण्याची खात्री तयार होऊ शकेल.

**नीला लिमये,**
महाराष्ट्र महिला परिषद

# अंतरंग


- महानगरपालिका एक अवकाश ५
  **'जी बजेट'**
  *श्री. कल्याण केळकर, सल्लागार, अ.भा.स्था.स्व.संस्था,*
  *मुंबई आणि निवृत्त आयुक्त, अहमदनगर महापालिका*

- विशेष लेख ७
  - **'स्त्री भ्रूण हत्या : एक सामाजिक गुन्हा'**
    *ॲड. मनिषा तुळपुळे, मुंबई*
  - **'वैवाहिक समस्या हाताळताना ...'**
    *सुवर्णा भुजबळ, विवाह समुपदेशक, मुंबई*

- ७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगतीपुस्तक ११
  **'७४वी घटना दुरूस्ती व महापालिकांची आर्थिक संसाधने'**
  *श्री. प्रशांत पिसोळकर, सल्लागार आणि निवृत्त महानगरपालिका मुख्य लेखा परिक्षण,*
  *मुंबई महानगरपालिका*

- शहरनामा १५
  **'पुणे तिथे स्त्रियांची सुरक्षितता नक्कीच उणे !'**
  *किरण मोघे, राज्य अध्यक्ष, अ.भा. जनवादी महिला संघटना*

- खुले पान १८
  **'सुरक्षा मुळापासून केव्हा व कसे काम करणार आहोत'**
  *हरिश सदानी, मावा संस्था*

- कारभारणीचा अजेंडा २०
  **'महिला दक्षता समिती : महिला सुरक्षेसाठीचे प्रभावी माध्यम'**
  *मुमताज शेख, कार्याध्यक्ष, महिला मंडळ फेडरेशन कोरो, मुंबई*

- 'बचत गटांना काय हवे ?' २२
  *निलिमा तपस्वी, पुणे*

## ‘महानगरपालिका कारभार : एक अवकाश’

# ‘जी’ बजेट

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील नागरी क्षेत्रात ४६ टक्के महिलांची लोकसंख्या आहे. महाराष्ट्रातील असंख्य ज्ञान -अज्ञान महिलांनी मोठे कार्य करून इतिहास घडविला आहे. स्त्रियांनी नेहमीच बाजूला राहून पुरूषांना आगेकूच करण्याचे सामर्थ्य दिले आहे. महाराष्ट्रातील मुलींनी व महिलांनी महाराष्ट्राचे पर्यायाने भारताचे भवितव्य घडविण्याच्या कार्यात पुरूषांच्या बरोबरीने भागीदार म्हणून हक्काचे स्थान प्राप्त केले आहे. राज्यशासनाने महिला संबंधी धोरण निश्चित केले आहे. भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने वर्ष २००७ पासून जेंडर बजेट ही संकल्पना राबविण्याचा संकल्प केला आहे. बालके व महिलांच्या दैनंदिन गरजा विचारांत घेऊन जेंडर बजेट तयार करणे अपेक्षित आहे. ११ व्या पंचवार्षिक योजनेत महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष लक्ष दिले आहे. केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने केंद्रशासनाच्या अन्य विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या महिलांसंबंधीच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी उपगट (subgroup) तयार केले. आहेत. त्यामध्ये भारत सरकार मधील विविध विभागाचा समावेश होतो. वर्ष २००४-२००५ मध्ये सदर गटाने केलेल्या शिफारशीनुसार वर्ष २००५ - २००९ च्या अर्थसंकल्पात महिलांच्या १० मागण्यांसाठी रू. १४, ३७९/- कोटीची तरतूद केंद्रशासनाच्या वित्त विभागाने स्वतंत्ररित्या जेंडर बजेट स्टेटमेंन्टमध्ये केली. वर्ष २००६-२००७ मध्ये महिलांसंबंधी २४ मागण्यांसाठी रू. २८,७३७/- कोटी तरतूद केली वर्ष २००७-२००८ मध्ये केंद्र शासनाच्या विविध विभागांकडून महिलांसंबंधी आलेल्या मागण्या विचारांत घेऊन महिला व मुलींसाठी १०० टक्के इष्टांकपूर्ती करण्याचे निर्धारित केले आहे.

वर्ष १९९७-२००२ मध्ये नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये **राज्य व केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात किमान ३० टक्के निधी हा महिला सक्षमीकरणासाठी, महिलांच्या सेवासुविधांसाठी तरतूद करावा असे निर्देश दिले आहेत.**

वर्ष २००२ - २००७ च्या दहाव्या पंचवार्षिक आराखड्यात महिलांसाठी त्यांची देशभरातील लोकसंख्या विचारांत घेऊन जेंडर बजेटची प्रक्रिया राबविण्याची शिफारस केली आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनेत भरीव आर्थिक, तरतूदीसह (Budjeting for Gender Equilty) या तत्वानुसार महिला सक्षमीकरणासाठी केंद्रशासन, राज्यशासन, आणि स्थानिक प्रशासनाने महिलांच्या संख्येप्रमाणे उद्दिष्ट ठरविणे व त्यानुसार जेंडर बजेट अंतर्गत तरतूद करणे व त्यानुसार महिलांच्या प्राथमिक स्वरूपाच्या गरजा विचारांत घेऊन खर्च करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातील नगरपरिषदा, महानगरपालिकांसाठी नगरविकास विभागाने शासन निर्णय क्र. संकिर्ण २००५ / प्र.क्र. १५६ / ०५ / नवि - २० दि. ३० डिसेंबर २००६ रोजी निर्गमित केला आहे. त्या अनुषंगाने दि. १९-१-२००८ रोजी राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्तांची बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. वर्ष २००९-१० चे अर्थसंकल्प तयार करतांना महिलांकरिता (Gender Budget) नागरी गरीबांसाठी आर्थिक तरतूदी अर्थसंकल्पात करण्यासंबंधी बरीच सकारात्मक चर्चा झाली.

नगरपरिषदा, महानगरपालिकांमधील विविध विभागांकडून बराच खर्च दरवर्षी होतो. त्यामध्ये महिला व बाल कल्याण समिती सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषदा, महानगरपालिकांचे शिक्षण मंडळ तसेच अन्य विभागाकडून महिलांच्या संबंधी होणारा सर्व खर्च एकत्रित करून महिलांच्या, शालेय मुलींच्या व बालकांच्या व्यवस्थेवर नागरी स्थानिक संस्थाचा एकूण किती खर्च होतो यांचा एकत्रित परामर्श घेऊन किमान **३० टक्के खर्च होतो, अगर कसे हे तपासून पाहण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या आहे. परंतु राज्यशासनाने ३० टक्के खर्च ‘महिलां सक्षमीकरण’ करण्यासंबंधी कोणतेही निर्देश नागरी स्थानिक संस्थांना दिलेले नाहीत किंवा तसा शासन निर्णय सुध्दा उपलब्ध नाही.** दि. ३० डिसेंबर २००६ च्या शासननिर्णयात महिला बाल कल्याण समितीने राबवायच्या योजना दिलेल्या आहेत तथापि नगरविकास विभागाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण - २००५ / प्र.क्र. १५६ / ०५ / नवि - २० दि. ३०-१२-२००६ नुसार नगरपरिषदा, महानगरपालिकांच्या एकूण उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा जाता ५ टक्के एवढी रक्कम महिला व बाल कल्याण समितीसाठी राखीव आहे. अन्य २५ टक्के निधी कसा उभारावा याबाबत स्पष्ट मार्गदर्शन नाही.

नगरपरिषदा, महानगरपालिकांकडील विविध विभागांकडून महिला व बाल कल्याण विषयक कामे होतात जसे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून महिलांसाठी शौचालये, प्रसाधनगृहाची निर्मिती, महिलांसाठी उद्याने, शिक्षण विभागाकडून बालवाडी, मुलींच्या शाळेंची देखरेख व व्यवस्थापन, आरोग्य विभागाकडून महिलांची आरोग्य तपासणी, सुतिकागृह चालविणे, महिला व बालकांचे लसीकरण करणे, इत्यादी कामे नगरपरिषदा, महानगरपालिका करीत असतात; परंतू त्या सर्व खर्चाची एकत्रितरित्या जेंडर बजेट अंतर्गत तरतूद होणे आवश्यक आहे.

सन १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्याने भारतातील पहिले महिला धोरण तयार केले आहे. भारत सरकारने ७३ वी व ७४ वी घटनादुरूस्ती करून नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय केंद्र शासनाने घेतला. आता महिलांना स्थानिक संस्था मध्ये ५० टक्के आरक्षण देऊन महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थाची कारभारीण केले आहे. कुटुंब, समाज, राष्ट्र, अर्थव्यवस्था याचा विकास घडविण्यात व सामाजिक स्थितीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यात महिलांचा मोठा सहभाग राहिला आहे. महिलांसाठी त्यांच्या गरजा व समस्या विचारात घेऊन कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक आहे. स्त्रियांसाठी विकसनशील दृष्टीकोन लक्षात घेऊन योजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे त्यासाठी पायाभूत सुविधा, सहाय्यसेवा, प्रशिक्षण उपलब्ध करून देणे जरूरी आहे. महिलांचा दबावगट निर्माण करून महिला विकासांच्या योजना राबविणे व त्यामध्ये सातत्य राखणे ही कामे महिलांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्थाकडून होणे अपेक्षित आहे. नगरपरिषद व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांत सुधारणा करून महिला व बाल कल्याण समीतीला पुरेसे अधिकार व जबाबदारी सोपविणे आवश्यक आहे.

**आजच्या स्थितीत महिला बाल कल्याण समितीची अधिनियमांत तरतूद आहे. परंतु समितीस अधिकार नाही. म्हणून जेंडर बेजट, जेंडर ऑडीट यासह महिला व बालकल्याण संबंधीचे प्रशासकिय, वित्तीय मंजूरीची अधिकार महिला व बाल कल्याण समितीला प्रदान करू अगोदर समिती सक्षम करणे आवश्यक आहे.** जेंडर विषयक कामाचे सनियंत्रण, पर्यवेक्षण याची जबाबदारी सुध्दा महिला सक्षमपणे पार पाडू शकतात. पण यामध्ये निवडून आलेल्या महिला नगरसेविकांच्या पती राजांवर नियंत्रण आवश्यक आहे. सध्या बहुतेक नगर परिषदा, महानगरपालिकांमध्ये नगरसेविकांऐवजी पतीराजांचा कामकाजांत हस्तक्षेप सुरू आहे. त्यासाठी महिला नगरसेविकांची क्षमता बांधणी करून महिलांचे सक्षम नेतृत्व तयार करावयाचे आहे. महिलांचे हक्क मिळविण्यासाठी सर्व महिलाविषयक काम करणाऱ्या संघटनानी एकत्र घेऊन सर्वपक्षिय महिला, आमदार, खासदार, नगरसेविकांचे प्रभावी संघटन उभारून शासनाकडून महिलांच्या कल्याणकारी व विकसनशील सुधारणा, योजना राबविण्याची नितांत गरज आहे.

**श्री. कल्याण केळकर**
सल्लागार
अ.भा.स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

❒❒❒

## महाराष्ट्र राज्याचे महिला धोरण २०१३ च्या प्रस्तावित मुसुद्या मधील जेंडर बजेटविषयातील महत्त्वाच्या सूचना.

- जेंडर बजेटच्या पाठपुरावा करण्यासाठी आणि ते प्रत्यक्षात उतरण्यासाठीची जबाबदारी राज्य महिला आयोग किंवा तत्सम यंत्रणा अशा महत्वाच्या संस्थेकडे दयावी.
- केंद्र आणि राज्य शासनाकडून येणारा निधी आणि कर रूपाने जमा होणारा निधी यांच्यासह एकूण जमा होणारा निधी यांच्यासह एकूण जमा होणाऱ्या निधीच्या १० टक्के निधी जेंडर बजेटसाठी वापरण्यात यावा.
- जेंडर बजेटचे लेखा परिक्षण शासनामार्फत दरवर्षी करण्यात येईल व त्याचा अहवाल विधीमंडळास सादर केला जाईल.

## विशेष लेख

# 'स्त्री भ्रूण हत्या : एक सामाजिक गुन्हा'

प्रिय कारभारणी,

आपण आपली रोजची कामे पार पाडत असताना आपल्याला अनेक लोक येऊन भेटतात. त्यातल्यात्यात महिलांना तुमच्याबद्दल विशेष जवळीक वाटत असते. त्या आपली दुःखे तुमच्यापाशी बोलतात.

तुमच्यापैकी एकही कारभारीण अशी नसेल की जिच्याकडे एकही महिला स्वतःच्या हिंसेविषयीची तक्रार घेऊन आली नसेल. लैंगिक हिंसा, घरगुती हिंसाचार याला महिलांना मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते. त्यातच एक मोठा भाग 'मुलगी नको, मुलगा हवा' म्हणून होत असलेल्या छळाचा आहे.

लोक काय बरं सांगतात ? त्यांना मुलगा का हवा असतो ? वंशाला दिवा म्हणून, म्हातारपणाची काठी म्हणून. मुलगी का नको तर तिच्यासाठी हुंडा द्यावा लागतो म्हणून, मुलीचा पाय घसरुन ती आपल्या तोंडाला काळं फासेल ही भिती असते म्हणून....

मग ही मंडळी काय विविध उपायांची चर्चा करतात. 'मुलगाच' व्हावा म्हणून खूप काही सल्ले मिळतात. त्यात दुसरे लग्न करणे (म्हणजे पुरुषाने बरं का ) बुवाकडे जाणे, सोनोग्राफी करणे, मुलगा हवा अशा प्रकारची उपचार पध्दती तज्ञ डॉक्टरकडून घेणे या सर्वाचा समावेश असतो.

यापैकी कोणत्याही गोष्टीसाठी बाई तयार झाली नाही तर तिचा अतोनात छळ होतो. तिला माहेरी पाठवणे, मारहाण करणे, टोचून बोलणे या सर्वाला सामोर जावे लागते.

मग 'मुलगा' होण्यासाठीचे उपाय व त्यासाठी बाईचा केला जाणारा छळ या सर्वांबद्दल कायदा काय सांगतो ते पहाणे महत्त्वाचे आहे.

त्यासाठी माहिती करून घेऊ. पी. सी. पी. एन. डी. टी. ॲक्टची (गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंगनिवडीवर प्रतिबंध) कायदा १९९४) असे मोठे नाव असलेला हा कायदा आहे. या कायद्याची पार्श्वभूमी जरा लक्षात घेऊ. फार वर्षापासून मुलगा होत नाही तर पत्नीला 'टाकणं', दुसरे लग्न करणं, बुवाकडे जाणं, किंवा मुलगी जन्माला आल्यावर तिला मारून टाकणं, कधी दुधाच्या घंगाळात बुडवून, कधी नदी विहीरीत ढकलून, असे अघोरी प्रकार होत. पण सत्तरीच्या दशकात स्त्री गर्भवती असतानाच काही उपचारांसाठी विविध निदान तंत्रे विकसित होऊ लागली.

गर्भवती मातेला किंवा बाळाच्या जिवाला काही धोका आहे का ? त्याला काही जनुकीय आजार आहेत का ? हे पाहाण्यासाठी विविध निदान तंत्रे आहेत. त्यामध्ये गर्भाशयातील पाण्याची चिकीत्सा, गर्भमुखाजवळील उतींची तपासणी हे प्रकार असत परंतु या चिकित्सेमध्ये गर्भाचे लिंगही समजत असे. मग लोक अशी चिकीत्सा करुन मुलींचा गर्भ पाडून टाकू लागले. ह्या घटना उघडकीला येऊ लागल्या. तसेच जनगणनेमध्ये ०.६ वयामधील (शून्य ते सहा) दर हजारी मुलींचे प्रमाण मुलांपेक्षा झपाट्याने कमी होऊ लागले. म्हणुन मग विविध महिला संघटना, विज्ञानवादी कार्यकर्ते, पत्रकार, प्राध्यापक यांनी एकत्र येऊन कायद्याची मागणी लावून धरली. अभिमानाची गोष्ट म्हणजे हा कायदा १९८८ मध्ये महाराष्ट्रात सर्वप्रथम आला विशेष म्हणजे हे खाजगी विधेयक होते. त्यात विरोधी पक्षाने सांगितलेल्या दुरुस्त्या स्विकारुन हे विधेयक मंजूर केले. आपण कारभारणी असल्यामुळे या विधेयकाचे कामकाज आपण नीट समजून घ्यायला हवे.

पुढे १९९४ मध्ये हा कायदा संपूर्ण भारतासाठी लागू करण्यात आला. तर २००३ मध्ये त्यात सुधारणा करण्यात आली. त्यात तिच्यावर लिंगनिवडीचे तंत्र वापरण्यात आले आहे, अशा महिलेला प्रथमदर्शनी या कायद्यात निर्दोष मानले आहे. तसेच १९८८ पासून १९९४ पर्यंत आलेली निदानतंत्रे सोनोग्राफी इ. याचा अंतर्भाव केला. तसेच तोपर्यंत गर्भधारणेपूर्वीही 'मुलगा' हवा अशा प्रकारची उपचार पध्दती करता येऊ लागली होती. त्याचा सुध्दा अंर्तभाव या कायद्यात करण्यात आला म्हणजेच आता गर्भधारणे पूर्वी वा नंतर कोणत्याही चिकीत्सेचा उपयोग हा मुलगा किंवा मुलगी आहे. यासाठी म्हणजेच लिंगनिवडीसाठी करण्यास कायद्याने बंदी आहे. असे करणाऱ्या डॉक्टरला ३ वर्षे सजा व रू.१०,०००/- दंड तसेच एखाद्या स्त्रीला असे तंत्र वापरण्यासाठी डॉक्टरकडे आणणाऱ्या व्यक्तीस ३ वर्षे सजा व रू.५०,०००/- दंड आहे. तसेच अशा उपचार पध्दतीची जाहिरात करणाऱ्यास ३ वर्षे

सजा व रू.१०,०००/- दंड अशी शिक्षाही आहे. शिवाय डॉक्टरवर कोर्टात आरोप निश्चित झाल्यावर त्याची नोंदणी सस्पेंड होते.

**या कायद्याची अंमलबजावणी आरोग्य विभागाकडे आहे व शहरी भागासाठी तर ती नगरपालिका व महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे आहे.** त्यासाठी प्रत्येक निदानतंत्र सेंटर्सची नोंदणी आरोग्य विभागाकडे व्हायला हवी. अशा सेंटरवर लिंग निवडीस बंदी असल्याचा बोर्ड ठळकपणे हवा. तसेच त्यांच्याकडे येणाऱ्या पेशंटचा दरमहा अहवाल त्यांनी आरोग्य विभागाकडे जमा करायला हवा. अन्यथा तेथील सेंटर्सवरील मशीन सील करुन त्या डॉक्टर्सना कोर्टात खेचायचा अधिकार ओरोग्य विभागाकडे आहे. यासाठी आरोग्य खात्यातील अधिकारी 'समुचित प्रधिकरण' म्हणून या काद्याखाली घोषीत केलेले आहेत. शिवाय त्यांनी एक सल्लागार समितीही करायची असते. त्यांच्या बैठका नियमितपणे व्हाव्यास अशी अपेक्षा आहे. त्या समित्यांमध्ये कायदेतज्ञ व महिला सक्षमीकरणातील कार्यकर्ते यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

पालिकेतील कारभारीण म्हणून आपण या गोष्टीत लक्ष घालणे आवश्यक आहे. कारण महाराष्ट्रात आज ८००० पेक्षा जास्त सोनोग्राफी केंद्र आहेत व हा धंदा १५० कोटींचा आहे. (दर वर्षाला) मुंबईसारख्या महानगरीतही २०११ मध्ये मुलींचे प्रमाण दरहजारी ८३८ इतके कमी आहे.

एक लक्षात घ्यायला हवे. हा कायदा लिंगनिवडीला प्रतिबंध करतो. त्याबाबतीत 'स्त्रीभ्रूण हत्या' हा शब्दप्रयोग अर्थासकट

चुकीचा आहे. कारण त्यामुळे स्त्रीच्या गर्भपाताच्या हक्कावर गदा येते. एका महापालिकेने तर त्यांच्या परवानगीशिवाय गर्भपात करु नये असे परिपत्रक काढून चूक लक्षात आल्यावर मागे घेतले. विरोध गर्भपाताला नसुन लिंग निवडीला आहे. गुन्हाही 'निवड' हाच आहे. त्यामुळे गर्भपातावर बंदी आणण्यासारखे उपाय योग्य नाहीत.

आपल्याला कायद्याच्या पलिकडे जाऊन काही गोष्टी करायला हव्यात. मुला मुलींना समानतेने वाढवण्यासाठी घरापासूनच सुरूवात करायला हवी. मुलगी व सुनेला योग्य आहार, उपजिवीका, शिक्षण व मालमत्तेचा हक्क द्यायला हवा. कौटुंबिक हिंसा विरोधी कायद्याचा आग्रह धरायला हवा. हो, मुलगी झाली म्हणून किंवा मुलगा होत नाही म्हणून घरातले त्रास देत असतील तर महिलेला कौटुंबिक अत्याचार विरोधी कायद्याखालीही तक्रार करता येते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमच्या सारख्या कारभारणी घराचेच नव्हे तर वॉर्डाचेही 'नाव' राखतात, घरचाच नाही तर वॉर्डाचाही आधार बनतात. या स्वतःपासून घालून दिलेल्या उदाहरणानेच मुलीच्या जगण्याची हक्काची चळवळ पुढे नेता येईल.

**कारभारणींसाठी कामाचा अजेंडा :**

१) आपल्या आरोग्यविभागाकडून या कायद्याच्या अंमलबजावणीची माहिती घ्या.

२) राज्यसरकारची नोटीफिकेशन प्रक्रिया समजून घ्या.

३) आपल्या वॉर्डात जनजागृतीचा कार्यक्रम घ्या.

**ॲड. मनीषा तुळपुळे, मुंबई**

❒❒❒

## काही महत्वाची आकडेवारी

**२०११ च्या जनगणनेनुसार,**

- महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११.२३ कोटी आहे. यामध्ये महिलांची लोकसंख्या ४८इ आहे. स्त्रियांचे प्रमाण १००० पुरूषांमागे ९४६ आहे.
- महाराष्ट्रातील स्त्री प्रमाण कमी असलेले जिल्हे असे आहेत. यामध्ये - मुंबई शहर - ८३८, मुंबई उपनगरे - ८५७, ठाणे - ८८०, पुणे - ९१०, बीड - ९१२, औरंगाबाद ९१७, व उस्मानाबाद - ९२०.

## विशेष लेख

# 'वैवाहिक समस्या हाताळताना....'

माझ्या मैत्रिणीने तिच्या ८ वर्षाच्या मुलीला मी समुपदेशक असल्याची ओळख करून दिली. तेव्हा मी समुपदेशक आहे हे तिला कळल्यावर ती लगेच म्हणाली, 'आमच्या शाळेतही समुपदेशक आहेत. पण त्या मला काहीच मदत करू शकल्या नाहीत.' या मुलीची आवडती निळ्या रंगाची छत्री हरवली म्हणून ती शाळेच्या समुपदेशिकेकडे गेली होती. माझ्या मैत्रिणीचे म्हणणे होते की, छत्री हरवली यात समुपदेशक काय मदत करणार ?

खरं आहे. छत्री शोधून देणे हे काही समुपदेशकाचे काम नाही. परंतु, समुपदेशकाची भूमिका, समुपदेशनाबद्दल सर्वसाधारण समज असे अनेक मुद्दे या उदाहरणावरून पुढे येतात. आवडती छत्री हरवल्यामुळे ती मुलगी दुःखी झाली होती. हरप्रयत्ने तिला छत्री मिळाली नाही, तेव्हा तिला समुपदेशकाची आठवण आली. तिने एवढेच ऐकले होते की, समुपदेशक विद्यार्थांना मदत करण्यासाठी आहेत. कोणत्या प्रश्नासाठी त्यांच्याकडे जायचे ते समजण्याचे तिचे वय नसले, तरी मदत घेता येते, एवढे तिला नक्की लक्षात राहिले होते.

छत्री शोधून देण्यासाठी समुपदेशकाने मदत करावी, ही अपेक्षा घेऊन ती मुलगी तिच्याकडे गेली होती. त्या समुपदेशिकेने तिच्या भावना समजून घेणे आवश्यक होते. मदतीसाठी ती दुःखी व त्रासलेल्या भावनेने गेली होती. समुपदेशिकेने तिला आश्वस्त करणे, दिलासा देणे, तिचा प्रश्न व अपेक्षा समजून घेणे खरे तर अपेक्षित आहे. शाळेत हरवलेली छत्री त्या मुलीचा एकटीचा प्रश्न बनला होता. आपण मिळून तुझी छत्री शोधू असा आधार तिला मिळायला हवा होता. शोधून छत्री नाही मिळाली तर ती आता मिळणार नाही, यासाठी तिला तयार करणे गरजेचे होते.

### समुपदेशकाची भूमिका

हे उदाहरण द्यायचे कारण की, मदत मागणारा जेव्हा आपल्याकडे येतो, त्यावेळी त्याला एवढेच माहीत असते की, इथे आपल्याला मदत मिळू शकेल. नगरसेवक ही त्या वस्तीशी जवळीक असलेली व्यक्ती असते. तिला काही अधिकार असतात. तिच्या प्रतिष्ठित व्यक्ती व अधिकाऱ्यांशी ओळखी असतात. नगरसेवकाला काही अधिक माहिती असणार एवढे मदत मागणाऱ्या व्यक्तीला समजते. पोलिस स्टेशन, कोर्ट कचेरी या मार्गाला न जाता, होणारा त्रास, दुःख कमी व्हावे, ही साधी अपेक्षा असते. नगरसेवकांना त्यांचा ठरलेला कारभार सांभाळायचा असतोच. त्याचबरोबर वस्तीतले वादविवाद, भांडणे, कौटुंबिक समस्या त्यांच्यापर्यंत येत असतात. या समस्या सोडविणे हे काही नगरसेवकांच्या कामाचा भाग नसतो.परंतु, काही नगरसेवक यात चांगल्या प्रकारे लक्ष घालतात. यामुळे स्थानिक पातळीवर नाते जोडले जाते व लोकांनाही एक आधार तसेच मार्ग मिळतो. हे प्रश्न केवळ धाकधपटशाने सोडविणे किंवा आलेल्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेनुसार सोडविले जाणे किंवा या प्रश्नांना नगण्य समजणे योग्य होणार नाही.

आपण या विषयाची हाताळणी अधिक विचारपूर्वक व परिणामकारक करण्याचा प्रयत्न करूया. आलेल्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे व काळजीपूर्वक आपण ऐकतो आहोत; हे त्या व्यक्तीला जाणवले पाहिजे. यातून प्रश्न समजायला व तिला आश्वस्त व्हायलाही मदत होते. ऐकण्यासाठी नेहमीच वेळ देणे शक्य होईलच असे नाही. अशावेळी त्यांना आपले म्हणणे लेखी आणण्यास सांगितले तर त्यांची अपेक्षा समजायला मदत होते. ज्या व्यक्तीबद्दल समस्या व तक्रार आहे, त्या व्यक्तीला बोलावून तिची बाजू समजून घ्यावी. दोघांची बाजू ऐकून घेताना टीका टिप्पणी करणे, मत व्यक्त करणे, शेरे मारणे कटाक्षाने टाळावे. दोघांना एकत्रित बसवून बोलणी करावी. या प्रक्रियेत समस्येचा अंदाज येतो. दोघांची व्यक्तिमत्वे, त्यांचे नातेसंबंध लक्षात येतात. आपल्याकडे आलेल्या व्यक्तींवर समाजाच्या चालीरीतींचा, अपेक्षांचा पगडा असतो. हा पगडा आपल्यावरही कमीअधिक प्रमाणात स्वाभाविकपणे असतो. नवऱ्याने कमवावे, अधिकाराने, आपल्या मर्जीने वागावे, थोडेफार मारले, चुकले तर जास्त मारले तरिही चालेल. तर पत्नीने धाकात, पती व सासरच्यांच्या पूर्ण मर्जीत रहावे अशी रूढ समजूत आहे. पतीचे लग्नबाह्य संबंध पटले नाही तरी मान्य केली जाणारी गोष्ट दिसते. उलट पत्नीचेच चुकत असेल. तीच नवऱ्याला सुख द्यायला कमी पडत असेल किंवा नवऱ्याला ताब्यात ठेवायला तीच कमी पडली, अशा पध्दतीने पतीच्या वागण्याचे एकप्रकारे समर्थन होताना दिसते. बाईच जरा अगाऊ आहे असा दृष्टिकोण असतो. कोणीही कोणाला मारणे हे चुकीचे आहे. मग त्याची कमी की जास्त अशी चर्चा करणे किंवा कोणत्या कारणासाठी मारले याची चर्चा होऊ नये. पती-पत्नी नात्यात आदर, सन्मान, आपुलकी, प्रेम व एकमेकांविषयीची काळजी, जपणूक दोघांकडूनही सारखीच व्हायला हवी. एकाने आदर करायचा व दुसऱ्याने केला नाही तरी चालेल, हे कोणाला रूचेल ? अपमानित होणारी व्यक्ती

अपमान करणाऱ्या व्यक्तीविषयी मनात आदरभाव ठेवू शकेल का ?

बेजबाबदार वागणे, शिवीगाळ करणे, वाईटसाईट बोलणे, अपमान करणे, मारहाण करणे, आक्रस्ताळेपणे वागणे, दुसऱ्याला दहशतीखाली ठेवणे, हे असे वागणे कोणत्याही परिस्थितीत दोघांपैकी किंवा दोघांच्या कुटुंबीयांपैकी कोणाहीकडून होत असेल,तर ते थांबेल असेच पहावे.

प्रश्नाची सोडवणूक दोघांनाही हवी असते. पण आपल्या शर्ती व मर्जीनुसार. काही वेळेस मान अपमानही आड येतात. तेव्हा, या शर्ती दोघांच्या संमतीने व्हायला हव्यात. त्या एकतर्फी होता कामा नयेत. तसेच वरीलपैकी त्रासाची वागणूक होणार नाही, हे पाहून त्या नक्की केल्या जाव्यात.

**नगरसेवकाची भूमिका प्रश्न हाताळताना**

नगरसेवक म्हणून काम करताना एवढा वेळ प्रत्येकाला देणे शक्य होणार नाही; परंतु, आपल्या सहकारी कार्यकर्त्यांमधून या विचाराने काम करणारा एक गट प्रशिक्षण देऊन तयार केला जाऊ शकतो. आपण आपल्या विभागात, जिल्ह्याच्या ठिकाणी वरील विचार मानून काम करणाऱ्या सामाजिक संस्थांशी जोडून घेऊन आपल्या कामाचे जाळे विस्तारू शकता. आपली मदत मागायला आलेल्या व्यक्तीशी प्राथमिक दिलासा देणारी बोलणी करून या संस्थांकडे या व्यक्तीला पुढील मदत घेण्यासाठी पाठवू शकता.

काही वेळा मानसोपचार तज्ञ, मानसशास्त्रज्ञ यांची मदत घेणे आवश्यक असते.तेव्हा आपल्या विभागातील मानसोपचारतज्ञ, मानसशास्त्रज्ञ अशांशी संबंध जोडून असावे.

काही वेळा समस्या असलेल्या व्यक्तीच्या राहण्याची व्यवस्था तातडीने करणे गरजेचे असते, अशावेळी वसतिगृहे, आधार गृहांना संपर्क करून मदत मिळवून देणे गरजेचे असते. काही वेळा पोलीस स्टेशनकडून कार्यवाही करणे, तर काहीवेळा कोर्टातून आदेश घेणे आवश्यक असते. या संदर्भातील माहिती आपण वेळोवेळी करून घेणे महत्वाचे असते.

पोलीस स्टेशनमधील महिला दक्षता समित्या कार्यरत राहतील व त्या समितीत सदस्यांची नेमणूक योग्य प्रकारे होईल, यात लक्ष घालणे व या सदस्यांशी कायम संपर्कात राहणे हे ही महत्वाचे आहे.

महिला, विवाह विषयक कायदे यांची माहिती करून घ्यायला हवी. कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, विवाहविषयक कायदे, कुटुंब न्यायालयाचा कायदा व रचना, कुटुंब न्यायालयातील विवाह समुपदेशकाची भूमिका, स्त्रीधनाचा कायदा, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, विनयभंग व बलात्काराचा कायदा इ. संबंधित कायद्यांची ओळख करून घेतल्याने येणाऱ्या व्यक्तीला योग्य मार्गदर्शन करता येते. तसेच परस्पर संमतीने तोडगा काढताना हक्क व नुकसानीच्या बाबींचा अंदाज करता येतो.

ही सर्व कामे समस्येतून मार्ग काढण्याच्या तात्पुरत्या उपाययोजनांचाच भाग आहे. हे करण्याबरोबरच आपल्या विभागात मुला-मुलींसाठी शिबिरे घेऊन स्त्री पुरूष समानता व सन्मान, अहिंसेचा विचार पोहोचवता येईल. यातून नवी पिढी अधिक न्याय्य व सुदृढ आयुष्य जगू शकेल. महिला-पुरुषांचे मेळावे घेऊन त्यांच्या पर्यंतही हा विचार पोहोचवता येईल. जेणेकरून त्यांचे एकमेकांशी नाते आपुलकीचे व जबाबदारीचे होईल. अशा वातावरणात मुलांची मानसिक व शैक्षणिक वाढ चांगली होण्यास मदत मिळते. समाजातील विचार स्त्री पुरूषांना माणूस म्हणून समान मानणारा, परस्परांना सन्मान देणारा असा होत गेला की माणसाने माणसाशी चांगले वागावे, हे सांगावे लागणार नाही. मतभेद असतील. वागण्याच्या, जगण्याच्या पध्दती वेगळया असतील; पण एकमेकांना सामावून घेणे व समजून घेणे होईल. कोणा एकाला दुसऱ्याच्या भीतीमध्ये जगावे लागणार नाही, असा सुदृढ समाज व्हावा या दिशेने प्रवास करूया व एकमेकांना यासाठी साथ देऊया.

**- सुवर्णा भुजबळ**
विवाह समुपदेशक,मुंबई
suvarnabhujbal@gmail.com

❒❒❒

**महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण २०११ - २०१२**

- घरगुती हिंसाचार - ४३.४%,
- अनैतिक वाहतूक प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हे - १.१%,
- लैंगिक छळ - ३.६०%,
- बलात्कार - १०.६ %,
- अन्य गुन्हे - ०.२%.
- हुंडा प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हे - २.९%,
- हुंडा बळी - ३.८%,
- अपहरण - १५.६%,
- विनयभंग - १८.८% व

(स्त्रोत : नॅशनल क्राईम रेकॉड ब्यूरो २०११-२०१२)

## ७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगतीपुस्तक

# '७४वी घटना दुरूस्ती व पालिकांची आर्थिक संसाधने'

डिसेंबर, १९९२ मध्ये संसदेने ७४वी घटना दुरूस्ती अधिनियम, १९९२ संमत केला व १ जून १९९३ पासून हा अधिनियम लागू करण्यात आला. घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून दिला, इतकेच नव्हे तर, प्रशासकीय संरचनेचा तृतीय स्तर असलेल्या ना. स्था.स्व.सं. त्यांची कामे करण्यासाठी, अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करवून दिले. त्या दिशेने नगरपालिकांच्या स्थापनेसाठी आवश्यक पावले उचलण्यात आली व नगरपालिकांना विशिष्ट कामे सोपवण्यात आली.

या अधिनियमातील अनुच्छेद २४३ (डब्ल्यू) नुसार प्रत्येक राज्य शासनांला अधिनियमाच्या बाराव्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेली १८ कामे पार पाडण्याचे अधिकार व जबाबदाऱ्या दिल्या आहेत. तसेच बाराव्या परिशिष्टामध्ये ना.स्था.स्व.सं. चे कार्यक्षेत्र स्पष्ट केले आहे. सोबतच्या चौकटी मध्ये अठरा कामांची यादी देण्यात आली आहे. यानुसार राज्य शासनाने संबंधित नगरपालिका अधिनियमात सुधारणा करून त्यामध्ये नगरपालिकांच्या या कामांचा समावेश केला आहे.

नगरपाकिंची नव्याने समावेश करण्यात आलेली कामे पुढीलप्रमाणे आहेत - समाजातील दुर्बल घटकांचे तसेच शारीरीक व मानसिकदृष्ट्या विकलांग लोकांचे हित जपणे, गरिबी दूर करणे, शहरी भागातील वनीकरण, पर्यावरण सुरक्षा, पर्यावरणाला अनुकूल बाबींना प्रोत्साहन देणे, झोपडपट्ट्यांमध्ये सुधारणा घडवून आणणे इत्यादी. शहराचा आर्थिक विकास व नागरीकांना सामाजिक न्याय मिळावा यासाठीच्या योजना तयार करण्याचे अधिकार व जबाबदारी ना.स्था.स्व.सं.ना सोपवण्यात आली आहे.

७४ वी घटना दुरूस्ती अधिनियम १९९२ च्या बाराव्या परिशिष्टात नमूद करण्यात आल्याप्रमाणे नगरपालिकांची कामे (अनुच्छेद २४३ डब्ल्यू)

१. शहर नियोजन व नगर नियोजन

२. जमिनीचा वापर व बांधकाम

३. आर्थिक व सामाजिक विकास नियोजन

४. रस्ते व पूल

५. घरगुती व औद्योगिक व व्यावसायिक वापरासाठी पाणी पुरवठा

६. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन

७. अग्निशामक सेवा

८. शहरी वनीकरण, पर्यावरणाचे संरक्षण व पर्यावरण संवर्धनाशी संबंधित बाबींना प्रोत्साहन देणे.

९. शारीरिक व मानसिकदृष्ट्या विकलांग व्यक्तीं तसेच समाजातील इतर दुर्बल घटकांचे हित जपणे.

१०. झोपडपट्यांमध्ये सुधारणा घडवून आणणे.

११. शहरी भागातून गरीबी दूर करणे.

१२. उद्याने, खेळाची मैदाने इत्यादी शहरी सुविधा पुरवणे.

१३. सांस्कृतिक, शैक्षणिक व कलाविषयक बाबींना प्रोत्साहन देणे.

१४. दफनविधी व दफनविधीच्या जागा, स्मशानभूमी व विद्युत दाहिनी

१५. प्राण्यांसाठी कोंडवाडे, प्राण्याच्या बाबतीत केल्या जाणाऱ्या क्रूर छळाला प्रतिबंध घालणे.

१६. जन्म व मृत्यू नोंदणीसहीत इतर महत्वाची आकडेवारी, माहिती

१७. रस्त्यांवरील दिवे, पार्किंग लॉटस, बसथांबे व सार्वजनिक सुखसोयी यांच्यासहित इतर सार्वजनिक सुविधा पुरवणे

१८. कत्तलखाने व टॅनेरीजवरील नियंत्रण

अनुच्छेद २४३ एस अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे विकेंद्रीकरण व्हावे यासाठी संस्थात्मक यंत्रणेची तरतूद

करण्यात आली आहे, यामध्ये विकेंद्रीकरणासाठी **प्रभाग समित्यांची रचना व स्थापना केली जाणे** बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. नगरपालिकेची सर्व कामे योग्य रीतीने केली जावीत यासाठीच्या दैनंदीन कामकाजाची प्रभाग स्तरावरील जबाबदारी प्रभाग समित्यांवर सोपवण्यात आली आहे. या सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकारने नुकत्याच प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य सरकाराने संबंधित नगरपालिका, अधिनियमांत सुधारणा घडवून आणल्या आणि विकेंद्रीकरण, स्वतःसाठीच्या योजना तयार करण्याचा अधिकार लोकांना देणे, प्रभाग व क्षेत्र स्तरावरील निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांना सहभागी होता यावे यासाठी क्षेत्र सभेच्या रचनेची तरतूद केली आहे.

**आर्थिक स्वायत्तता :**

ही सर्व वेगवेगळया प्रकारची कामे करण्यासाठी ना. स्था.स्व.सं.ना पुरेसे आर्थिक स्त्रोतही उपलब्ध करून दिले पाहिजेत. पुरेसे महसूल स्त्रोत उपलब्ध करून न देता, केवळ कामे वाटून दिल्याने कोणतेही सकारात्मक परिणाम दिसून येणे शक्य नाही. ना.स्था.स्व.सं. कडून ज्या जबाबदाऱ्या पार पाडल्या जाण्याची अपेक्षा केली जात आहे. तितक्याच प्रमाणात कर व महसुलाच्या इतर स्त्रोतांच्या बाबतीतही स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार, जास्तीत जास्त लाभदायक पध्दतीने महसूल स्त्रोतांचा वापर करण्याचे व शहराच्या गरजांनुसार विविध सेवा पुरवण्यासाठी या महसुलांचा वापर करण्यांचे अधिकार ना.स्था.स्व.सं. ना असणे आवश्यक आहे.

**स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी स्थानिक नगरपालिका करांची यादी**

१९२१ ते १९३७ या काळात स्थानिक प्रशासनाला स्वतंत्र कर आकारण्याचे अधिकार होते. १९२१ सालापासून अंमलात आणल्या गेलेल्या भारत सरकार अधिनियम १९१९ मध्ये स्थानिक करांची यादी आहे. हे कर नगरपालिकेने आकारावेत अशी तरतूद करण्यात आली होती आणि त्यामुळे नागरिकांना विविध सेवा पुरवण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ नगरपालिकेला या करांमधून उपलब्ध करवून दिले गेले होते.

परंतु १९३५ साली तयार करण्यात आलेल्या व १९३७ सालापासून अंमलात आणल्या गेलेल्या भारत सरकार अधिनियमात स्थानिक करांच्या यादीचा समावेश नव्हता आणि त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना कर आकारणी बाबतीत कोणतीही विशेष अधिकार दिले गेले नाहीत.

भारत सरकार अधिनियम १९१९ मध्ये नगरपालिकांकडे सोपवण्यात आलेल्या करांची स्थानिक यादी

१. टोल

२. जमीन व जमीन मूल्यावरील कर

३. इमारतीवरील कर

४. वाहने व बोटींवरील कर

५. हमाल व घरगुती नोकरांवरील कर

६. जकात

७. सीमा कर (टर्मिनल)

८. व्यापार, व्यवसाय व उद्योगांवरील कर

९. खाजगी बाजारपेठांवरील कर

१०. सरकारतर्फे पुरवण्यात येणाऱ्या पुढील सेवांसाठी लावण्यात येणारा कर

अ. पाणीपट्टी

ब. वीजपट्टी

क. मलनिस्सारण कर

ड. बाजारपेठेच्या वापरासाठीचे शुल्क

इ. इतर सार्वजनिक सुविधांसाठी कर

७४वी घटनादुरूस्ती विकेंद्रिकरणाच्या तरतूदी नंतरही ना.स्था.स्व.स. कर आकारता / लागू करता येतील अशा स्थानिक करांची राखीव यादी दिलेली नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोणते कर आकारावेत हे ठरविण्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे.

दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्याची तरतूद या घटना दुरूस्तीमध्ये असली तरी महाराष्ट्रात आत्तापर्यंत केवळ तीन वित्त आयोग स्थापन केले गेले आहेत. स्थानिक करांची यादी तयार करण्याची सूचना आजतागायत तरी या आयोगांनी केलेली नाही, तसेच महाराष्ट्र राज्य सरकारनेही त्यादृष्टीने पावले उचललेली नाहीत.

या अधिनियमामध्ये ना.स्था.स्व.सं. ना करांचे वाटप, स्थानिक करांची यादी तयार करणे, नगरपालिकांना आर्थिक स्वातंत्र्य व स्वायत्तता देणे या विषयांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. या अधिनियमातील अनुच्छेद २४३ (एक्स) नुसार ना.स्था. स्व.संस्थाकडून आकारण्यात येणारे कर, शुल्क, टोल, त्यांना दिली जाणारी अनुदाने या सर्व बाबी राज्य सरकारच्या अखत्यारीत ठेवण्यात आल्या आहेत.

कलम २४३ एक्स - नगरपालिकांचे कर आकारणी, व महसूल उभा करण्याचे अधिकार

राज्याच्या विधानसभेला कायद्यानुसार पुढील अधिकार देण्यात आलेले आहेत

अ) कायद्यानुसार आखून देण्यात आलेल्या कार्यपध्दती व मर्यादांना अनुसरून, कर, शुल्क, टोल आकारण्याचे व जमा करण्याचे अधिकार नगरपालिकेला देणे.

ब) कायद्यानुसार आखून देण्यात आलेल्या कारणांसाठी व अटी तसेच मर्यादांना अनुसरून राज्य सरकाराने आकारलेले व जमा केलेले शुल्क, टोल व फीज् आकारणीची जबाबदारी नगरपलिकेला देणे.

क) राज्याच्या एकत्रित जमा निधीतून नगरपालिकांना सहाय्यक अनुदान देण्याची व्यवस्था करणे.

ड) नगरपालिकांना किंवा नगरपालिकांच्या वतीने मिळालेला सर्व पैसा जमा करण्यासाठी व कायद्यातील तरतुदीनुसार असा पैसा विनियोग (खर्च) करण्यासाठी निधी स्थापन करणे.

अशाप्रकारे विशिष्ट तरतूद केली गेलेली असतानाही राज्य सरकारने कोणत्याही सुधारणा उपाययोजना केलेल्या नाहीत. या ७४ वी घटनादुरूस्तीच्या कायद्याला अनुसरून पालिका कायद्यामध्ये सुधारणा करूनही महाराष्ट्र शासनाने या मुद्यांकडे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे आता कर, शुल्क, टोल यांच्यामार्फत मिळणाऱ्या महसुलासाठी नगरपालिकांना राज्य सरकारवर अवलंबून रहावे लागत आहे.

काही नगरपालिका क्षेत्रांमध्ये नगरपालिकांकडून जकातीखेरीज सध्याचे कर, शुल्क, टोल आकारले जात आहेत. एप्रिल २०१३ पर्यंत, टप्प्याटप्प्याने ना.स्था.स्व.संस्थामध्ये जकात रद्द करून त्याऐवजी स्थानिक संस्था कर आकारण्याचे महाराष्ट्र राज्य सरकारने तत्त्वतः मान्य केले आहे. १ मे १९९९ पासून नगर परिषद क्षेत्रांमध्ये जकात रद्द करण्यात आलेली असल्यामुळे नगर परिषदांना राज्य सरकारकडून जकातीऐवजी सहाय्यक अनुदान दिले जाते.

- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १२७ अन्वये महाराष्ट्रातील महानगरपालिकांना (मुंबई व नागपूर महानगरपालिका वगळता) पुढील कर जमा करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

१. संपत्ती कर

२. वाहने, बोटी व प्राण्यांवरील कर

३. जकात किंवा वस्तूंच्या वाहतूकीवरील कर (सेस) किंवा स्थानिक संस्था कर

४. कुत्र्यांवरील कर

५. शहरात आणले गेलेले प्राणी व वाहनांवरील कर

६. साठेबाजीवरील कर

७. होर्डींगवरील कर

८. दुकानांकडून परवाना शुल्क

९. राज्यघटनेनुसार राज्यशासनाला राज्यात जे कर आकारण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत त्यापैकी इतर कोणतेही कर (व्यवसाय, उद्योग, व्यापार व नोकऱ्यांवरील करांव्यतिरिक्त)

- मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम १३९ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कर आकारणीच्या तरतुदी पुढीलप्रमाणे करण्यात आल्या आहेत.

१) संपत्ती कर - कलम १४०

२) कुत्र्यांवरील कर - कलम १९१ ए

३) सिनेमा कर - कलम १९१ ई

४) जकात - कलम १९२

या व्यतिरिक्त काही बृहन्मुंबई महागनरपालिकेला खालीलप्रमाणे कर आकारणी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत

१) संपत्ती कर - यामध्ये खालील करांचा समावेश होतो जे इमारती व जमिनीवर आकारले जातात.

अ) पाणीपट्टी - कलम १४० (१) (अ) (i) पाणी पुरवठ्यासाठी

ब) अतिरिक्त पाणीपट्टी - याला वॉटर बेनिफिट टॅक्स असे नाव देण्यात आले आहे - कलम १४० (१) (अ)

(ii) पाणी पुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या यंत्रणेची कामे, देखभाल व संचालन यासाठीचा कर.

क) सांडपाणी, मलमूत्र याच्या स्वच्छतेसाठीचा कर - कलम १४० (१) (ब) ((i)) मला व इतर कचरा जमा करणे, साफ करणे त्याची विल्हेवाट लावणे यासाठीचा कर

ड) सांड़पाणी स्वच्छतेसाठीचा अतिरिक्त कर - मैला व इतर कचऱ्याच्या स्वच्छतेसाठीच्या सुविधा, यंत्रणांची उभारणी, देखभाल व संतालनासाठीचा कर - कलम १४० (१) (ब) (ii)

इ) सर्वसाधारण कर - कलम १४० (१) (सी) कलम ६१ (के) व प्रकरण १४ मधील तरतुदींनुसार

महानगरपालिकेच्या कर्तव्यांची पूर्तता करण्यासाठीचा कर - नगरपालिका अग्निशामक दल.

फ) शिक्षण कर - कलम १९५ ई

ग) पथ कर - कलम १९५ जी

ह) प्रकरण १२ - ए नुसार आकारण्यात आलेले सुधारणा शुल्क - शहर सुधारणा योजना

य) मोजून पाणी पुरवठ्यासाठी पाणीपट्टीऐवजी पाणी शुल्क - कलम १६९

ज) मोजून पाणी पुरवठ्यानुसार सांडपाणी करा ऐवजी सांडपाणी, मलमूत्र स्वच्छता शुल्क - कलम १७०

ख) अग्निशमन सेवेसाठीचा कर

ल) वृक्ष प्राधिकरणासाठी वृक्ष कर

म) महाराष्ट्रात इमारतींवर आकारला जाणारा कर - उंच इमारतींवरील कर

न) दुरूस्ती मंडळाची वसुली व दुरूस्ती मंडळासाठी सूट देण्याचा दुरूस्ती कर

व) ट्रेड रिफ्यूज चार्जेस् - घन कचरा व्यवस्थापन सेवांसाठी टी.आर.सी.

- भारत सरकार व राज्य सरकारकडून नगरपालिकांना विविध सहाय्यक अनुदाने दिली जातात. काही कर असे असतात ज्यांची आकारणी व कर जमा करण्याचे काम राज्य सरकार करते, परंतु त्या करांपैकी काही भाग सहाय्यक अनुदानाच्या स्वरूपात नगरपालिकांना दिला जातो. अशा काही करांची यादी पुढीलप्रमाणे आहे

  १) व्यावसायिक कर

  २) मनोरंजन कर

  ३) मुद्रांक शुल्क - संपत्ती हस्तांतरण

  ४) मोटर वाहन कर

- त्याचबरोबर विविध योजना, कार्यक्रम, प्रकल्पांची अंमलबजावणी नगरपालिकांकडून केली जाते व यासाठी त्यांना अनुदान दिले जाते. यामध्ये,

१) आरोग्य कार्यक्रम - कुटुंब कल्याण कार्यक्रम, लसीकरण, जननी सुरक्षा योजना, मलेरिया निर्मुलन कार्यक्रम, पोलिओ लसीकरण योजना, एड्स प्रतिबंध कार्यक्रम इत्यादी.

२) प्राथमिक शिक्षण कार्यक्रम, सर्व शिक्षा अभियान

३) महिला व बाल कल्याण कार्यक्रम, एसजेएसआरवाय - सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना

४) राजीव आवास योजना

५) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण योजना

६) जकातीऐवजी सहाय्यक अनुदान

स्थायी समिती व महागनरपालिकेच्या मंजुरीनुसार करांचे दर ठरवले जातात. या सर्व करांची, विशेषतः संपत्ती कराची आकारणी पालिका अधिनियमात आखून देण्यात आलेल्या मर्यादांनुसार व स्थायी समिती आणि महानगरपालिकेच्या मंजुरीने केली जाते. कायदेशीर मर्यादांच्या व्यतिरिक्त नवीन कर आकारणीसाठी राज्य सरकारने राज्य विधानसभेच्या मंजुरीने नगरपालिका अधिनियमात सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. शुल्कांची आकारणी जरी महानगरपालिका आयुक्तांच्या मंजुरीने जरी करण्यात येत असली तरी (शुल्क मंजुरी अधिकाऱ्याबाबत विशिष्ट तरतूद नसल्याने महानगरपालिका आयुक्त करांचे दर ठरवू शकतात) कर, शुल्क, फी इत्यादींची आकारणी करणे; जमा करणे इत्यादींबाबतचे नियम, कार्यपध्दती स्थायी समितीच्या अनुमतीने तयार केली जातात. या नियम व शर्तींना अनुसरून बिलींग जारी केले जाणे, जमा केले जाणे इत्यादी कामे ही महागनरपालिका आयुक्तांची जबाबदारी आहे.

यावरून हे स्पष्ट होते की,

एका विशिष्ट मर्यादेपर्यंत पालिकांना करांमध्ये फेर बदल करणे, त्यांचे दर ठरविण्याचे अधिकार आहेत मात्र त्या उपर नवीन कर ठरविण्याचे व ते आकारण्याचा निर्णय हा पालिकांना राज्य शासनाच्या संमतीशिवाय घेता येत नाही.

७४ व्या घटना दुरूस्तीमुळे कायद्यांमध्ये सत्ता विकेंद्रीकरणाच्या सुधारणा झाल्या असल्यातरीही याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व आर्थिक संसाधने मात्र दिली गेली नाहीत हे वास्तव आहे.

त्यामुळे महापौर, उपमहापौर, नगरपालिकांमधील सदस्य, विरोधी पक्षांचे सदस्य, सर्व राजकीय पक्षांचे विविध पदाधिकारी यासांरख्या स्थानिक लोकप्रतिनिधींना स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्थानिक करांची यादी तयार केली जावी तसेच या यंत्रणांना आर्थिक स्वातंत्र्य दिले जावे अशी मागणी केली पाहिजे.

**- श्री. प्रशांत पिसोळकर**
निवृत्त महागरपालिका, मुख्य लेखा परीक्षक,
मुंबई महानगरपालिका व प्रमुख सल्लागार,
अ.भा.स्था.स्व.सं, मुंबई

❒❒❒

## शहरनामा

# 'पुणे तिथे स्त्रियांची सुरक्षितता नक्कीच उणे !'

एकेकाळी पुण्याची ''सुरक्षित शहर'' म्हणून ख्याती होती. किंबहुना, पुण्यातल्या स्त्रिया सायकलीवरून मोकळेपणाने फिरतात, रात्री-अपरात्री नाटक-सिनेमा पाहतात, स्त्री-स्वातंत्र्याबद्दल जाहीरपणे नियतकालिकांच्या माध्यमातून वादविवाद करतात आणि एकूणच जरा 'आगाऊ' आहेत अशी चर्चा असे ! महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई फुले,गोपाल गणेश आगरकर, महर्षी कर्वे, रघुनाथ कर्वे आणि इतर अनेक समाजसुधारकांची 'छाप' ह्या शहरावर होती, आणि स्त्रियांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यामध्ये अर्थातच त्यांच्या विचारांचा आणि कृतीचा सिंहाचा वाटा होता. आज मात्र विकासाच्या नावाने शहरामध्ये जे बदल घडत आहेत, त्यामुळे हे वातावरण झपाट्याने बदलत चालले आहे.

पुरोगामी, सांस्कृतिक दृष्ट्या विकसित आणि स्त्रियांच्या दृष्टीने सुरक्षित म्हणवून घेणाऱ्या पुण्यात जणू आता बाईचा जीव मातीमोल होत चालला आहे. बलात्कार, विनयभंग, छेडछाड, अपहरण, हुंडाबळी, कौटुंबिक छळ, कामाच्या ठिकाणी आणि कामावर येता-जाता होणाऱ्या अत्याचारांची प्रकरणें वाढतच चालली असून पोलिसांकडे दाखल झालेल्या केसेसच्या संख्येत मोठी भर पडली आहे. २००९ साली पुणे शहरात स्त्रियांविरोधी ४७६ (पैकी ५७ बलात्कार) गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंदवले गेले, २०१० मध्ये त्यांची संख्या ६०६ झाली. (पैकी ७५ बलात्कार; २७% वाढ) आणि गेल्यावर्षी ६६३ (पैकी ६५ बलात्कार; १३.२% वाढ) पर्यंत गेली.

खाली दिलेल्या चौकटीतली उदाहरणे ह्या साठी दिली आहेत की ह्या सर्व तरूण, सुशिक्षित व प्रतिष्ठित उद्योग समुहात चांगल्या पदांवर काम करणाऱ्या महिलां होत्या. पुणे शहराच्या विकासात स्त्रियांचे योगदान लक्षणीय आहे. माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्र, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, सरकारी कार्यालये, खाजगी कारखाने, घराघरातून चालणारे छोटे-मोठे उद्योग, घरकाम सेवा, कचरा वेचणे, बांधकाम, किरकोळ विक्री, इत्यादि व्यवसायातल्या कष्टकरी - कामकरी महिलांशिवाय हे शहर चालू शकत नाही. परंतु त्यांच्या सुरक्षिततेकडे न शासनाचे लक्ष आहे न समाजाचे. ज्या आयटी क्षेत्राने नागरी प्रशासनाकडून अनेक प्रकारच्या भरपूर सवलती मिळवल्या आहेत, त्या उद्योगांनी आपल्या परिसरात सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी कोणत्याही स्वरूपाचा पुढाकार घेतलेला दिसत नाही. कंत्राटी पध्दतीच्या 'कॅब सर्विस' चा वापर करून खर्च वाचवण्याचा नादात रात्री - अपरात्री प्रवास करणाऱ्या स्त्रियांच्या सुरक्षितेबद्दल ज्योतीकुमार चौधरी आणि नयना पुजारी सारखी प्रकरणे घडली तेव्हा प्रथम गांभीर्याने विचार व्हायला लागला, आणि आजही अनेक स्त्रियांना सुरक्षित वाटत नाही ही वस्तुस्थिती आहे. ढिसाळ कारभार, आवश्यक मार्गांचा आणि पुरेशा बसेसचा अभाव आणि न परवडणारे तिकिटाचे दर, हे पुण्याच्या सार्वजनिक बस सेवेची सुरूवातीपासून लक्षणे राहिली आहेत ! टाटा, बजाज, फिरोदिया इत्यादी उद्योगपतींनी उभ्या केलेल्या मोठ्या वाहन निर्मिती उद्योगांचा माल खपायला वाव मिळाला ! आज पुणे शहरात खाजगी वाहनांची संख्या

२००७ एप्रिल - रूपाली चव्हाण (वय २४) ह्या ग्राफिक डिझायनर तरूणीचे वाहन चालकाकडून अपहरण आणि खून; नोव्हेंबर २००७ - ज्योतिकुमार चौधरी (वय २२) ह्या कॉल सेंटर मध्ये काम करणाऱ्या तरूणीवर चालक व त्याच्या मित्राकडून बलात्कार आणि खून; ऑक्टोबर २००८ - खुशबू मिश्रा (वय २२) ह्या अभियंता स्त्रीचा राहत्या घरी मित्राकडून खून; मार्च २००९ - बी.पी.ओ. मध्ये काम करणाऱ्या विद्या घोरपडे व तिच्या ४ वर्षाच्या मुलाचा स्थानिक दुकानदाराकडून खून; मार्च २००९ - महाराष्ट्र विद्युत महामंडळात कनिष्ठ अभियंता ह्या पदावर कामाला असलेल्या पूजा सुरनार (वय २३) चा लग्नाला नकार दिला म्हणून खून, जुलै २००८ - सॉफ्टवेअर अभियंता उर्वशी ढवळे (वय ३२) हिचा पतीकडून सुपारी देऊन खून; जुलै २००८ - सॉफ्टवेअर अभियंता श्रध्दा छाजेड (वय २३) हिचा तथाकथित प्रियकराकडून खून; ऑक्टोबर २००९ - नयना पुजारी (वय २८) चा वाहन चालक आणि सुरक्षा कर्मचारी ह्यांच्याकडून सामूहिक बलात्कार करून खून; ऑक्टोबर २००९ - स्मिता सातपुने (वय ३२) हिचा पतीकडून गळा आवळून खून; एप्रिल २०१० - २५ वर्षीय व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थिनीवर सामुहिक बलात्कार; जुलै २०१० दर्शना टोंगरे ह्या प्रशिक्षण घेणाऱ्या अभियंतेचा खून

(**स्त्रोत** :पुण्यातील विविध वर्तमानपत्रांमधून संकलन (२०११)

मुंबई पेक्षा जास्त आहे ! गर्दीचा फायदा घेऊन भरगच्च बसेस मध्ये छेडछाडी पासून मंगळसुत्र चोरीचे प्रकार वाढत आहेत. प्रदूषण, वाहतुकीची कोंडी आणि अपघात, आणि ह्या सर्वांमुळे वाढलेला मानसिक ताण, ह्यामुळे सुध्दा स्त्रियांच्या सुरक्षिततेवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष विपरीत परिणाम होतात.

मुंबई मध्ये बी.ई.एस.टी. च्या ४६८० बसेस तर संपूर्ण पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या एकूण १५०० बसेस, पैकी ३०० नादुरूस्त ! मुंबईची सरासरी लोकसंख्या १.२५ कोटी आणि खाजगी वाहनांची संख्या २३ लाख, तर पुणे - पी.सी.एम.सी. ची एकूण लोकसंख्या ५५ लाख आणि खाजगी वाहनांची संख्या ३१ लाख !

आज पुण्याची ४०% लोकसंख्या गरीब ''झोपडवस्त्यां'' मध्ये राहते; तिथे कष्टकरी स्त्रियांच्या दृष्टीने सुरक्षिततेचे फारच मोठे प्रश्न उभे राहत आहेत. स्थानिक पुढाऱ्यांनी पोसलेले बेरोजगार तरूणांचे तांडे, सहज उपलब्ध असलेले अश्लील साहित्य, शाळेतून गरिबी आणि इतर कारणास्तव बाहेर पडलेल्या तरूण मुली, शास्त्रीय लैंगिक शिक्षणाचा अभाव, ह्यामुळे एक स्फोटक सामाजिक वातावरण निर्माण झाले आहे. अनेक कष्टकरी स्त्रियां आपण घरी जाईपर्यंत आपल्या शाळकरी अथवा तरूण मुली सुरक्षित असतील की नाही ह्या धास्तीत कायम वावरत असतात. एखादे लैंगिक अत्याचाराचे प्रकरण पोलिसात नेले तर गरिबांकडे पाहण्याचा तुच्छ दृष्टीकोन आणि आरोपींना पुढाऱ्यांकडून मिळणारा आश्रय ह्यामुळे ते तडीस जात नाही आणि एकूण वस्तीत दहशत पसरते. अशा लैंगिक अत्याचाराची दहशत वापरून कमजोर, एकटी स्त्री प्रमुख असलेल्या गरीब कुटुंबाना हुसकावून लावून त्यांच्या झोपड्या बळकावण्याचे प्रकार एकेकाळी जनवादी महिला संघटनेने पुण्याच्या काही वस्त्यांमध्ये थांबवलेले आहेत. शिवाय बेकायदेशीर दारू आणि जुगाराचे अड्डे, त्यातून होणारी भांडणे आणि ताणतणाव (ज्याचे रूपांतर मिश्र वस्तीत कधीही जास्त-जमातीय दंगलीत होण्याचा धोका असतो) ह्यामुळे एकूण स्त्रियांच्या दृष्टीने प्रचंड असुरक्षितता वाढली आहे.

पूर्वीपासून 'शिक्षणाचे माहेरघर' म्हणून ओळखले जाणारे हे शहर आता अभियांत्रिकी, मेडिकल, फार्मसी, व्यवस्थापन-शास्त्र, इत्यादी सर्व प्रकारचे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या खाजगी, विनाअनुदानित संस्थांचे देशातले एक प्रमुख केंद्र बनले आहे. तसेच इथल्या आयटी क्षेत्रात, व एकूण औद्योगीकरणामुळे तयार झालेल्या विविध सेवा क्षेत्रात स्त्रियांना छोट्या मोठ्या नोकऱ्या मिळत असल्यामुळे, महाराष्ट्राच्या मराठवाडा-विदर्भातून किंवा बाहेरच्या प्रदेशातून पुणे शहरात येणाऱ्या एकट्या स्त्रियांची संख्या लक्षणीय आहे. कदाचित पुण्याची सुरक्षित शहर म्हणून असलेली जुनी ख्यातीही त्यास जबाबदार असू शकते ! परंतु त्यांच्यासाठी सुरक्षित निवाऱ्याची सुविधा नाही. राज्य शासन, महापालिका आणि काही मध्यवर्ती भागातले घर-भाडे परवडत नसल्याने अनेकांना शहराच्या बाह्य परिसरात राहावे लागते. ह्या वस्त्यांवर महापालिकेकडून चांगल्या रस्त्यांची, दिव्यांची सोय केलेली नाही, वाहतुकीची सोय नाही, त्यामुळे असुरक्षितता वाढते. पुण्यात महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने बाहेरच्या जिल्ह्यातून येणाऱ्या तरूण आदिवासी मुलींसाठी जी भाड्याने घेतलेली वसतीगृह आहेत, ती मुख्य शहरापासून किमान १५-२० किलोमीटर अंतरावर आहेत ! ह्या शिवाय काही विशिष्ट राजकीय पक्षांनी पोसलेल्या संकुचित प्रातंवादाचा सुध्दा विपरीत परिणाम ह्या तरूणीना भोगावे लागतात ! काहीं वेळा बाहेरच्या प्रदेशातून राहणाऱ्या तरूणींना लक्ष्य करून स्थानिक गुंडांकडून छेडण्याचे प्रकार घडतात आणि पोलिस आणि स्थानिक नागरिक सुध्दा दुर्लक्ष करतात अशी लाजिरवाणी अवस्था आहे.

आज असे दिसते की शालेय मुलींवर लैंगिक अत्याचारांची संख्या वाढत चालली आहे. अनेक महापालिका शाळांची दुरवस्था आहे, त्यांना साधे कुंपण नसते. शाळेच्या बाहेर आणि कधी कधी आवारात टवाळ पोरं धिंगाणे घालत असतात आणि शिक्षकांना त्यांच्यावर नियंत्रण ठेवता येत नाही. लहान मुलांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण करणाऱ्या नव्या कायद्याप्रमाणे असे प्रकार लक्षात आल्यास ते पोलिसांना कळवण्याची जबाबदारी शिक्षक आणि शालेय प्रशासनावर टाकली आहे. अनेक वेळा शाळेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न किंवा आपल्या सहकाऱ्याला संरक्षण देण्यासाठी पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु तसे केल्यास शिक्षा होऊ शकते. ह्या कायद्याचे प्रशिक्षण सर्व शाळांना देणे अत्यावश्यक आहे. गेल्या काही वर्षात पुणे हे आंतरराष्ट्रीय दहशतवादी शक्तीचे सुध्दा लक्ष्य-स्थान बनल्याचे दिसून येते. जर्मन बेकरी किंवा अलीकडे डेक्कन जिमखाना परिसरात बॉम्बस्फोट घडवले गेले आणि एकूण नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे, परंतु सार्वजनिक ठिकाणी सी.सी.टी.व्ही. लावण्याचा उपक्रम किंवा एकूण गर्दी आणि वाहतुकीचे व्यवस्थापन, ह्याबद्दल इथले नागरी प्रशासन अतिशय सुस्त असल्यामुळे चर्चेपलीकडे फार प्रगती झालेली नाही.

थोडक्यात, पुणे असे एक शहर आहे की जिथे मोठ्या प्रमाणात स्त्रिया शिक्षणासाठी आणि रोजगारासाठी बाहेर पडतात, आणि त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता हा केवळ त्यांच्याच दृष्टीने नव्हे तर एकूण शहराच्या प्रतिमेच्या दृष्टीने एक महत्वाचा मुद्दा आहे. त्यासाठी प्रथम इथल्या नागरी

प्रशासनाने हा एक प्रश्न आहे हे स्वीकारण्याची आवश्यकता आहे.परंतु एखादे प्रकरण घडले की सभागृहात त्यावर तावातावाने चर्चा करून फार फार तर निषेधाचा ठराव करण्यापलीकडे इथले लोकप्रतिनिधी जात नाहीत असा अनुभव आहे. स्त्रियांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही अग्रक्रमाचे मुद्दे प्रथम शहराचा स्त्री सुरक्षिततेच्या दृष्टीने अभ्यास (Gender safty Audit) करून कमजोर जागा शोधून काढल्या पाहिजेत. त्यावर ठोस उपाय काढले पाहिजेत आणि त्यासाठी आवश्यक अर्थसंकल्पीय तरतूद करून अधून मधून अंमलबजावणी होत आहे की नाही ह्याचे सनियंत्रण केले पाहिजे. उदाहरणार्थ सर्व रस्ते, बस थांबे आणि सार्वजनिक ठिकाणी चांगली प्रकाश योजना, व्यवस्थित, स्वच्छ आणि प्रकाशमय सार्वजनिक मुताऱ्या व सब-वे, तिथे सुरक्षा रक्षकाची नेमणूक महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही., स्वस्त, दर्जेदार, सार्वजनिक बसेसची व्यवस्था, त्यात स्त्रियांच्या राखीव जागांची वाहक-चालकाकडून कसून अंमलबजावणी, प्रमुख आगरांवर रिक्षा संघटनांच्या सहकाराने शेअर-रिक्षाची सोय, आराम क़रण्यासाठी खोल्या, अशा सोयी महापालिकेने करणे सहज शक्य आहे. पोलीस खात्याबरोबर सुसूत्रीकरण करून स्त्रियांसाठी 'हेल्पलाईन' चालवण्यासाठी महापालिकेच्या बजेट मध्ये तरतूद करणे शक्य आहे. हे फोन क्रमांक बस तिकिटांवर, बस थांबे व बसेस मध्ये मोठ्या अक्षरात प्रदर्शित करणे, बचत गटांच्या सदस्यांना स्व-संरक्षणाचे प्रशिक्षण, शाळांमधून मूल्य शिक्षण तासात आणि शिक्षक-पालक सभेतून स्त्री-पुरूष समतेच्या मूल्यांचे, लैंगिक शिक्षणाचे प्रसारण, असे अनेक उपक्रम चालवणे शक्य आहे, परंतु त्यासाठी त्याप्रकारची दृष्टी आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे किमान महिला नगरसेवकांनी ती दाखवून ५०% आरक्षणाचा हेतू सफल करावा अशी अपेक्षा आहे. शेवटी, स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केवळ स्त्रियांचा नाही, सर्व सुजाण नागरिकांचा आहे. सुसंस्कृत शहर म्हणून पुण्याची ओळख राहायची असेल तर तसे वातावरण निर्माण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

**किरण मोघे,**
राज्य अध्यक्ष,
अ.भा.जनवादी महिला संघटना
kiranmoghe@gmail.com

❒❒❒

## 'स्त्रीची प्रतिमा उभी करण्यामधील प्रसार माध्यमांची भूमिका ?'

सिनेमा, टि. व्ही. ही समाजाच्या मानसिकतेवर परिणाम करणारी सर्वात अधिक प्रभावी माध्यमे आहेत.

समाजात चांगली, वाईट मूल्ये प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे या माध्यमातून समाजात रूजतात. पण समाजात चांगल्या गोष्टी रूजवायच्या आहेत, हेच ही माध्यमे विसरली आहेत. हिंसा, उत्तानपणा, अवास्तवतावाद, अनैतिकता यांचा अतिरंजीत वापर या माध्यमातून करून समाजावर कोणता आदर्श आपण निर्माण करतोय ?

आपण स्वतःच्या आहार-आरोग्याकडे लक्ष देतो पण मानसिक आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करतो. मानसिक आरोग्याची जोपासना लहानपणापासून घरातूनच व्हायला हवी. केवळ शाळा-कुटुंब यांवर ही जबाबदारी न ढकलता सर्व समाजाने आपली जबाबदारी मानली पाहिजे करमणूक हवीच पण ती सकस करमणूक हवी. बीभत्स हावभाव, अर्धनग्र कपड्यातील नृत्येच, फक्त करमणूक करतात का? काय दाखवायचे काय झाकायचे हे आपण ठरवले पाहिजे. कथानकाची मागणी, दिग्दर्शकाची मागणी, म्हणून उत्तान दृश्यांचे चित्रीकरण करण्याला माझा विरोधच आहे. जी गोष्ट पटत नाही त्याला नाही म्हणण्याची हिंमत हवी आणि पैसा - प्रसिध्दी मिळवण्यासाठी वाटेल ती तडजोड करणे पूर्ण चूकच आहे.

वाईट गोष्टी स्वीकारण्यात त्रास नसतो. बंधने नसतात त्यामुळे वाईट विचार चटकन स्वीकारले जातात. त्यासाठी समाज शिक्षण हवे. वाईट गोष्ट मी करणार नाही, नुकसान झाले तरी चालेल. प्रसिध्दी मिळाली नाही तरी चालेल हा दृष्टीकोन समाजात रूचण्याची गरज आहे.

**- सुमित्रा भावे**
चित्रपट दिग्दर्शिका

(**सौजन्य** : वरील भाग हा दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र, पुणे प्रकाशित 'महिला सुरक्षा विशेषांक २०१२' यातील आहे.)

## खुले पान

# ‘महिला सुरक्षा प्रश्नाच्या मुळापासून केव्हा व कसे काम करणार आहोत’

*डोळं तुमचं डोळं*

*तुमच्या डोळयांची मला भिती*

*खाली बघून चालू किती, खाली बघून चालू किती...*

*तुमचे डोळे प्रश्न पुसती*

*मी कुमारी का श्रीमती*

*खाली बघून चालू किती, खाली बघून चालू किती...*

प्रसिध्द लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या ज्योती म्हापसेकर यांनी फार वर्षापूर्वी लिहिलेल्या या कवितेच्या ओळी प्रश्न करताहेत पुरूषांना, पुरूषांच्या स्त्रीकडे बघण्याच्या पारंपारिक मानसिकतेला.

शिक्षणासाठी, नोकरी - व्यवसाय करण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या मुली - स्त्रियांची संख्या लक्षणीयरित्या वाढलेली आपणास दिसत असली तरी समाजात स्त्रीला सन्मानाने, सुरक्षितपणे वावरता येईल असं पोषक वातावरण देशातील मोठ्या शहरांतही आज असल्याचे आपणास दिसत नाही. आजही ज्योतीताईंच्या वरील ओळी पुरूषांना अंतर्मुख होऊन त्यांची पारंपारिक मर्दपणाविषयाच्या कल्पना बदलण्यासाठी प्रवृत्त करू शकतात.

पण आज दिसतंय काय आपणाला ? गेल्या वर्षभराच्या सार्वजनिक ठिकाणी झालेल्या स्त्री हिंसाचार व गैरवर्तनाच्या घटनांचा वेध घेतला असता. मुंबईतील अंबोली भागात किनन, रूबेन या तरूणांनी त्यांच्या मैत्रिणीची छेड काढली असताना हस्तक्षेप केल्यानंतर त्यांना जीवे मारण्यात आले, किंवा डिसेंबरमधील दिल्लीत बसमध्ये झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरण; या सर्व घटनांनंतर सर्व पातळींवर चर्चा झाली ती प्रामुख्याने संबधींत मुली किती वाजता घराबाहेर होत्या ? रात्री ८/८.३० वा. त्या रस्त्यावर काय करत होत्या, त्यांनी कोणते कपडे घातले होते ? घटना घडल्यानंतर त्यांनी काय केले वा करावयाला हवे होते इ.

या घटनांमागे असणाऱ्या मुलभूत गोष्टींविषयी किती साधकबाधक चर्चा झाल्याची आपणांस आठवते ? पुरूषांमधील असणारा आततायी विकृतपणा हा असा अचानकपणे तयार झालेला नसतो, त्याला वाढीस लागणाऱ्या कोणत्या गोष्टी असतात, अशा अत्याचारांच्या घटनांमध्ये अवतीभवती असणाऱ्या लोकांचा बघेपणा व त्याविषयी चीड - हे सारं येतं का आपल्या चर्चांमधून, संवादामधून ? जर पुरुष समस्येचा भाग आहेत, जर त्यांची प्रवृत्ती हा प्रश्नाचा भाग आहे तर मग समस्येच्या निवारणासाठी त्यांची भूमिका काही असू शकते का ? त्यासाठी कोणते व किती प्रयत्न होताहेत ? या सर्वांविषयी गांभीर्याने आपण सर्वांनी विचार करून, त्यादृष्टीने प्रयत्न केले तरच आपण प्रश्नाच्या मूळावर काम करू व स्त्रीच्या सुरक्षिततेच्या दिशेने, मुक्तपणे तिने संचार करण्यासाठी वातावरण तयार करण्याच्या दृष्टीने आपण काही पावलं पुढे जाऊ.

पारंपारिक मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या पुरूषत्वाच्या, मर्दपणाच्या संकल्पना मांडून पुरुषत्वाचे, पुरूषपणाचे नवे, सकारात्मक पर्याय तरूणांमध्ये रूजवायला हवेत. सशक्त नातेसंबंधाबाबत आग्रही असणाऱ्या अनेक स्त्री - मुलींसमोर स्त्री Role-Models जशा आहेत तसे किती पुरूष आजच्या मुलग्यांपुढे दिसतात ?

मेन् अगेन्स्ट व्हायलन्स ॲन्ड अब्युज (मावा) अर्थात महिलांवरील हिंसा व गैरवर्तनाविरूध्द संघटित होऊन काम करणाऱ्या देशातील पहिल्या पुरूषांच्या संस्थेतर्फे मी व माझे साथीदार गेली २० वर्ष काम करतोय. स्त्रियांवरील हिंसा, छेडछाड इ. प्रश्न हे स्त्रियांइतके पुरूषांनी आपले प्रश्न मानून त्यादृष्टीने व्यक्तिगत व सार्वजनिक पातळीवर प्रयत्न करण्यासाठी ‘मावा’ संस्था काम करीत आहे.

गेली ६ वर्ष तरूण मुलग्यांसोबत विशेषतः महाविद्यालयीन मुलग्यांसोबत ग्रामीण तसेच शहरी भागात ‘मावा’ तर्फे मी एक उपक्रम राबवित आहे. निवडक तरूण मुलग्यांना स्त्रीपुरूष नोतसंबंध, लैंगिकता, पुरूषत्व या सर्व मुद्यांवर त्यांना संवेदनशील बनवून त्यांनी समवयीन मुलग्यांबरोबर वरील मुद्यांवर सशक्त चर्चा संवाद घडवून स्त्रियांवरील हिंसेला कसं प्रतिबंधित करता येईल यासाठी त्यांना विविध तऱ्हेने दीर्घ

प्रशिक्षण दिलं जातयं. खेळ, लोकगीतं, पथनाट्य, दृष्टांतनाट्य, चित्रकथा, लघुपट, युवा मेळावा, प्रश्न पेटी, सामाजिक भित्तीपत्रकं इ. माध्यमांचा प्रभावीरित्या वापर करून माझे शंभरहून अधिक युवा संवादक आज पुणे, मुंबई, सातारा, कोल्हापूर, बुलढाणा, भंडारा, नागपूर या ७ जिल्ह्यांत अधिकाधिक तरूण पुरूषांपर्यंत पोहचत आहेत. हिंसक प्रवृत्तीच्या मूळाविषयी गांभीर्याने पुरूषां-पुरूषांमध्ये सुसंवाद घडवून ते पुरूषत्वाचे नवे पर्याय हजारों किशोरवयीन मुलांमध्ये रूजवत आहेत.

दिल्लीतील बलात्कार घटनेनंतर मुंबईतील गुरूतेगबहादूर नगरच्या गुरू नानक कॉलेजने भित्तीचित्रांचं प्रदर्शन अलीकडे भरवलं होतं. यामध्ये आलोचना संस्था, पुणे तर्फे चित्रकार संजय पवार यांनी काढलेलं भित्तीचित्र सर्वाचं लक्ष वेधणारं होतं. वाहतुकीच्या नियमविषयक चिन्हांचा वापर करून; समाज स्त्रीपुरूष दोघांचा, मग बाईलाच का नियम चाल चलनाचा ? हा संजयने उपस्थित केलेला प्रश्न तमाम तरूणांना विचार करायला प्रवृत्त करणारा असाच आहे. (हे भित्तीचित्र मलपृष्ठातील आतील पानावर दिले आहे.)

असाच एक प्रयत्न मुंबईतील ७ महाविद्यालयांत तयार झालेले माझे युवा संवादक करताहेत. 'रोडसाईड रोमिओंचा सुळसुळाट' या नावाच्या पथनाट्याद्वारे स्त्रीच्या सुरक्षिततेच्या प्रश्नाशी संबंधित विविध मुद्यांना स्पर्श करणाऱ्या नाटकाचे ५० हून अधिक प्रयोग या संवादकांनी आतापर्यंत केलेत. स्त्रीकडे 'मादी' वा 'वस्तु' म्हणून न बघता तिचे शरीर - मन - मत यांची कदर करण्यासाठी पुरूषांनी अंतर्मुख व्हावे म्हणून माझे संवादक साद घालत आहेत. पथनाट्याच्या अखेरीस खास पुरूषांना उद्देशून केलेलं पुढील आर्जव परिस्थितीत बदल आणण्यासाठी उचललेलं एक आश्वासक पाऊलच म्हणता येईल, नाही का ?

*आवर दादा रं, मनाला सावर दादा रं*

*बाई नाही खेळणं रं*

*जीवाला तिच्या जाण रं, आवर दादा रं .. ।।*

*मर्दपणा तुझा हा बोकाळला फार रं*

*वस्तु नाही बाई जरा मोल तिचं जाण रं*
*मादी म्हणून लागू नको नुसता तिच्या मागंणं*

*तिला वाटंल सुरक्षित याचं ठेव भान रं*

*सन्मानानं जगण्याचा आहे तिचा हक्क रं ।।*

*आवर दाद रं, मनाला सावर दादा रं*

*- श्री. हरिश सदानी*
*मावा, मुंबई*
*sharsh267@gmail.com*




❐❐❐

## कारभारणीचा अजेंडा

# महिला दक्षता समिती :'महिला सुरक्षिततेसाठी प्रभावी माध्यम'

डिसेंबर २०१०, मी ज्या विभागात राहते, त्या वाशीनाका परिसरातील म्हाडा एका १४ वर्षीय मुलीवर तिच्या शेजारी राहणाचा तरूण काहीतरी कामाच्या निमित्ताने तिला स्वतःच्या घरी बोलावून आधी बेशुध्द करून तिच्यावर बलात्कार केला व त्यानंतर तिचा निर्घुणपणे खून केला. या घटनेनंतर जणूकाही कीड लागावी त्याप्रमाणे फेब्रुवारी २०११ पर्यंत चेंबूर, मानखुर्द, कुर्ला आणि शिवाजीनगर सारख्या भागात ४ ते १६ या वयातील २२ मुलींसोबत अशा घटना घडल्या. या घटना नुसत्या घटना नव्हत्या, तर त्या समाजातील अमानवीय, क्रूर मानसिकतेच्या बळी होत्या. ज्या वयात खेळायचे, बागडायचे त्या वयात जे समजत नाही, कळत नाही असे प्रकार या मुलींसोबत घडले. कोणाला चॉकलेट देऊन, कोणाला जबरदस्ती आणि धमकी देऊन आशा क्रुर मानसिकता असलेल्या पुरूषी वृतींनी आपल्या वासनापूर्तीसाठी वापरले आणि संपवून टाकले. चार सुंदर स्वप्ने उध्वस्त झाली, काही मुलींच्या पालकांनी आपली रोजी-रोटी सोडून आपला संसार हलवला, काही अजून लढत आहेत. ह्यासर्व मुली कोण होत्या.. त्या गरीब, सामाजिक दृष्ट्या वंचित होत्याच; पण त्या फक्त मुली होत्या म्हणूनच त्या बळी पडल्या ! हे सगळ एक स्त्री म्हणून खूपच त्रासदायक चीड आणणारे होते. एक नागरिक, कार्यकर्ता म्हणून असहाय्य होतं. त्यातच या सर्व घटनांचा पाठपुरावा करताना पोलीस आणि शासन यंत्रणा (?) म्हणून आलेला अनुभव अंगावर येणारा होता. तातडीने दवाखाना आणि उपचारांची गरज असताना पोलीस स्टेशन मध्ये दोन-दोन तास रक्तबंबाळ अवस्थेत मुलींना बसवून ठेवणे, एफ.आय.आर नोंदवून घेण्यात होत असलेली टाळाटाळ, मुलींच्या आई-वडिलांना देण्यात येणारी धमकीवजा सूचना हे पाहून अधिकारी आशा घटनांकडे कसे बघतात हे सत्य समजले.

### सामाजिक हस्तक्षेप

या सर्व घटनांमुळे त्यावेळेस एकूणच चेंबूर-कुर्ला परिसरात लोकांमध्ये दहशतीचे वातावरण तयार झाले होते. रोज नवीन काहीतरी आणि अधिक भयानक असे ऐकायला मिळत होते. पोलीस तपास सुरू आहे असे सांगत होते. करायचे काय? हा प्रश्न मला आणि माझ्या संघटनेतील सर्वांनाच पडला होता. वरील सर्व घटनांची नोंद झाली पण पोलीस हलत नव्हते आणि पिडीत पालक हतबल झाले होते. पोलीस म्हणून जी काही व्यवस्था आहे त्यातील असंवेदनशीलता खुपली, प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस - नागरिक समन्वयासाठी काही रचना केलेली आहे. त्यातील एक म्हणजे **'महिला दक्षता समिती'**. ज्या पोलीस स्टेशन हद्दीत वरील सर्व गुन्हे घडले त्या आणि मुंबई मधील सर्वच पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या आशा सर्व रचना केवळ कागदावर आहेत, हे ही ह्या घटनांच्या पाठपुराव्यादरम्यान लक्षात आले. आम्ही संघटना म्हणून प्रत्येक घटनेचा अधिक आणि ठोस पाठपुरावा करण्याचे ठरवले. चेंबूर ट्रॉम्बे भागातील सर्व संस्था - संघटनांना एकत्र करून आम्ही सुरवात केली. आमचे पहिले पाऊल म्हणजे ज्या वस्तीत, विभागात ह्या घटना घडल्या त्या ठिकाणी निषेध सभेच्या माध्यमातून पिडीत कुटुंबाला **'सपोर्ट सिस्टम'** तयार करणे व ज्यांनी हे कृत्य केले त्यांना हा मेसेज पोहचवणे कि त्या एकट्या नाहीत आम्ही सोबत आहोत, पोलिसांविरोधात **'निषेध सभा'** घेणे. अशा १८ निषेध सभांच्या माध्यमातून आम्ही पोलिसांविरोधात एक वातावरण तयार केले. आणि दिनांक २५ फेब्रुवारी २०११ ला ४००० हजार महिलांचा मूक मोर्चा स्थानिक डी.एस.पी. यांच्या कार्यालयावर नेला. या मोर्च्यामध्ये १६ संस्था - संघटना सहभागी झाल्या होत्या. ह्या मोर्च्या नंतर मात्र पोलीस हलले. त्यावेळचे डी.सी.पी (झोन ६) श्री. दिलीप सावंत यांनी स्वतः लोकांना सामोरे जाऊन लोकांच्या सर्व मागण्या मान्य केल्या.

### महिला दक्षता समिती...अपेक्षा आणि वास्तव

ह्या मोर्च्या नंतर पोलीस संस्था - संघटना मिळून आम्ही महिला अत्याचार विरोधी मोहीम या परिसरात राबविली. घरोघरी जाऊन लोकांशी बोलणे, सभा घेणे असे व्यापक कार्यक्रम राबवले गेले. यातूनच वस्ती पातळीवर महिला अत्याचाराच्या प्रकारास आळा घालण्यासाठी आणि या घटनांमध्ये तात्काळ मदत करण्यासाठी महिला दक्षता समिती अधिक मजबूत करणे हा प्रस्ताव आम्ही पोलीसयंत्रणेसमोर ठेवला. कारण त्या अगोदर सर्व पोलीस स्टेशन मध्ये **'कागदावर दक्षता समिती होती, ज्या मिटींग होत होत्या त्या मध्ये राजकीय महिलांचा**

**पोलिसांच्या बाजूने हस्तक्षेप होता, या महिलांचा फक्त पंचनामा करण्यासाठी आणि जर पोलिसांना काही अडचण असेल तर त्यांचा ढाल म्हणून वापर करत होते.** हे वास्तव आम्ही जाणून होतो. आमच्या या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्या नंतर पुढील सहा महिन्याच्या काळात आम्ही झोन ६ मधील

(१) महिला दक्षता समितीची पुनर्रचना करणे,

(२) या समिती मध्ये स्थानिक संस्था संघटनेच्या महिला कार्यकर्त्यांचा सहभाग वाढविणे (एकूण ६५ महिला ८ पोलीस स्टेशनच्या दक्षता समितीमध्ये सहभागी झाल्या),

(३) सर्व सदस्य आणि पोलीस कर्मचारी यांचे महिला कायदे, व समुपदेशन या विषयावर प्रशिक्षण - या स्वरूपाचे कार्यक्रम आमच्या १६ संस्था संघटनेच्या नेटवर्क द्वारे आणि मुख्यतः महिला मंडळ फेडरेशनने केले.

(४) त्याच बरोबर वरील २२ घटनांच्या पाठपुरावा प्रक्रियेत पोलीस व न्याय यंत्रणा आणि पिडीत मुलींच्या कुटुंबाशी समन्वय व संवाद करण्याबरोबरच समुपदेशन, कायदेशीर मदत हेही काम संघटनेने केले.

आज झोन सहा मधील ९ पैकी ८ पोलीस स्टेशनमध्ये महिला दक्षता समिती प्रभावीपणे कार्यरत आहे. त्यापैकी आर.सी.एफ. पोलीस स्टेशन मध्ये समितीच्या वतीने महिला अत्याचारच्या केसेस बाबतीत समुपदेशन केंद्र सुरू केले आहे. महिला मंडळ फेडरेशन या सर्व समिती सोबत आणि १६ संस्था संघटना सोबत समन्वयाचे काम करते आहे. या महिला दक्षता समित्या वस्ती पातळीवर अधिक विकेंद्रित कशा होतील, फेडरेशनच्या वस्तीपातळीवरील 'सावित्री समस्या नोंद केंद्राशी' जोडून वस्ती पातळीवरील महिला अत्याचार कमी करणे, सकारात्मक वातावरण निर्माण करणे असे काम सुरू आहे.

**- मुमताज शेख**
कार्याध्यक्ष, महिला मंडळ फेडरेशन, मुंबई
mumtajcorommt@gmail.com

❒❒❒

## *गुन्हेगारांची मानसिकता अभ्यासताना . . . .*

मानसशास्त्रीय-सामाजिक सिध्दांतांनी स्त्रीयांवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांमधले काही घटक निश्चित केले आहेत. उदा. १) नीट विकसित न झालेला आत्मसन्मान किंवा अहंकार, २) वासनांचे दमन झालेले असणे, ३) बालपणी लैंगिक अथवा शारीरिक छळाची शिकार झालेले असणे, ४) सतत वादविवाद होणाऱ्या कुटुंबात लहानाचे मोठे होणे आणि त्यामुळे विधायक पुरुषी अस्मितेच्या शोधात स्वतःला झोकून देणे, ६) मद्य किंवा अमली पदार्थांचा प्रभाव, कमकुवत सामाजिकीकरण आणि 'अहं' ला संरक्षण देण्यात आलेले अपयश.

थोडक्यात, असे म्हणता येईल की गुन्हा ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असून हे चुकीचे पाऊल का पडते याचा नेमका एकच घटक सांगणे किंवा त्यासाठी एकच सैध्दांतिक चौकट आखणे अतिशय अवघड आहे. सामाजिक संरचना, शासकीय यंत्रणा आणि व्यक्ती यांच्यात खोल रुतलेले अनेक घटक एकत्र येऊन एक असे मिश्रण तयार होते की त्याद्वारा अनेकदा आपल्याला चक्रावून टाकणारे वर्तन प्रगट होते. विशेषतः जर असे वर्तन करणारी व्यक्ती आपल्यापैकीच एक असेल तर आपण गोंधळून जातो. ही वस्तुस्थिती बदलण्याचे ओझे आपण जितके जास्त कायदेशीर साधनांवर टाकत राहू तितके हे प्रश्न सर्वसमावेशक रीतीने सोडविणे आपल्याला अशक्य होऊन बसेल. 'कायदा म्हणजे फक्त नियम किंवा साधनांचा संच नव्हे, जो आपण आपल्याला आवडेल अशा आकारात वळवू शकतो', हे कॅरोल स्मार्ट 1998. (The Woman of Legal Discourse, In Criminology at the cross- roads, Ed. Kathleen Daly & Lisa Maher. New York : Oxford University Press, p.31) यांचे उद्‌गार योग्यच आहे कितीही यातनादायक असेल तरी आपलाच एक भाग म्हणून गुन्हेगाराला आणि त्याच्या वर्तनाला समजून घेणे, आणि अशा वर्तनाविषयीच्या प्रश्नांची उत्तरे आपल्या अंर्तमनात आणि बाहेरच्या समाजात शोधणे यातच या प्रश्नावरचा उपाय दडलेला आहे.

(**सौजन्य** : प्रा. डॉ. विजय राघवन, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, यांनी दृष्टि स्त्री अध्यन प्रबोधन केंद्र पुणे प्रकाशित 'महिला सुरक्षा' २०१२ या विशेषांकात लिहिलेल्या लेखामधील उतारा)

## कारभारणींचा अजेंडा

# बचत गटांना काय हवे ?

'बचतगट' ही सर्वसामान्य महिला वर्गातील महिलांचे अस्तित्व जपणारे वास्तव प्रत्यक्षात साकार करणारी घटना आहे. आपोआप विकसित होत गेलेली ही एक निकोप चळवळ आहे आणि ती अशी निकोपपणे चालत रहावी कारण नवी आर्थिक आणि सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे या बचत गटांमध्ये प्रचंड सामर्थ्य आहे.

ऑक्टोबर २००८ मध्ये बचतगटांना ४% व्याजदराने अर्थसहाय्य पुरविण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली. ही महिला वर्गासाठी पर्वणीच होती. बचतगटांना विमा संरक्षण देण्याबाबतही निवेदन देण्यात आले. त्यामुळे १० ऑक्टोबर २००८ हा दिवस खरोखरच ऐतिहासिक होता. नुकतेच तिसऱ्या महिला धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला. या पॅनेलवरची सल्लागार सदस्य या नात्याने महाराष्ट्राचा बचतगटांचा मसुदा करण्याची संधी मला मिळाली. तेव्हा पहिला प्रश्न मी उपस्थित केला तो म्हणजे; आजपर्यंत चार टक्के व्याजदराने गटांना कर्ज मिळतच नाही. मग या धोरणाचा फायदा काय ?

या मसुद्यामधे अत्यंत महत्त्वपूर्ण सूचना म्हणजे बचतगटांच्या इंडस्ट्रीजला औद्योगिक स्तर (स्केलींग) द्यावे म्हणजे आपोआप अर्थकारण औद्योगिक दृष्टीने बचत गटांना मदत करेल. तसे करण्यास कोणतीही गोष्ट आडवी येणार नाही व किमान पन्नास हजारापासून पाच लाखापर्यंतची आर्थिक मदत हक्काने, कायद्याने गटांच्या उद्योगाला प्राप्त होईल.

बचतगट इंडस्ट्रीला आम्ही जन्म दिला आणि उद्योगविश्वातले हे अनोखे सुवर्णपान ठरले. परंतु या चळवळीला हातभार लावणारे खरे हात किती ? हा मात्र प्रश्नच आहे.

२००७ च्या बजेटमध्ये स्वयंरोजगाराशी निगडीत काही नोंदी ढोबळकपणे मांडण्यात आल्या. या बजेटमध्ये बचतगटांसाठी ८ हजार ७९५ कोटीची तरतूद केली गेली. परंतु ही तरतूद कशांवर खर्च करायची आहे त्याच्या आराखड्यात मात्र दिलेले नाही.

आठ मार्च २०१३ ला तीसरे महिला धोरण - मसुदा महिला व बाल कल्याण मंत्री आदरणीय वर्षाताई गायकवाड यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना सोपविला. पुढे काय ? हा अनुत्तरित प्रश्न तसेच 'महिला बचत गटांनी' स्वतःच्या कष्टाचा पैसा गुंतविला आहे. कचरा गोळा करणाऱ्या महिला, धुणी भांडी करणाऱ्या महिला या गटात आपली गुंतवणूक करतात. कारण यात विश्वासाचे व प्रामाणिकपणाचे अर्थकारण आहे.

परंतु किती महिलांना 'बचतगट म्हणजे काय?' हे कळले आहे, हे जाणून घेण्यासाठी मी (२००८) अहिल्याराणी महाराष्ट्र महिला बजत गट सूची (डीरेक्टरी) प्रकाशित केली. ती केवळ याच एका उद्दिष्टाने. एकूण अकरा जिल्ह्यांचा समावेश पहिल्या सत्रात केला. संपूर्ण महाराष्ट्रात हे अभियान पसरविले. बचतगट स्वयंरोजगार निर्माण करुन त्यात किती गुंतवणूक करतात व किती कमवतात ? हे या सर्वेक्षणातून जाणून घेतले. या पाहणी मधून-दररोज आपला गॅस सिलेंडर स्वतःच डोक्यावर घेवून जावून - शाळांच्या आवारात सकस आहार योजनेतील 'खिचडी' शिजवायची व ती शाळांना वाटायची हे बचत गटांना करावे लागते हे विंदारक सत्य समोर आले. कारण रोज सिलेंडर रिक्षाने नेणे परवडतच नाही. शासनाने बचतगटांना अशाप्रकारे त्यांचे साहित्य ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करून दिलेली नाही

बचतगटांना यासाठी हवे आहे, विचारांचे, निर्णयांचे स्वातंत्र्य, उद्योगांमध्ये बचतगटांतून निर्माण झालेल्या उत्पादनांचे वर्गीकरण, औद्योगिकरणात स्वतंत्र कायदा, उद्योगांमध्ये असणारा स्वतंत्र उद्योगस्तर 'प्रणाली' जी बचत गटांना आर्थिक व तांत्रिक दृष्टीने सक्षम बनवतील व केवळ मानधन मिळवून बचतगट बंद करणाऱ्या, महिलांचे प्रमाण कमी होईल. राजकारण्यांची त्यातील सत्ता संपुष्टात येईल व खऱ्या अर्थाने बचतगटांचे औद्योगिकरण होईल यात शंका वाटत नाही.

बचतगटांची आर्थिक सत्ता वाढविण्यासाठी पुढील उपाय योजना करता येतील -

१. औद्योगिक व्यवस्थापनाचे प्रशिक्षण,

२. उत्पादन प्रक्रियांची तांत्रिक पध्दती,

३. बाजारपेठांचा सर्व्हे (सर्वेक्षण),

४ राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय बाजारपेङ्केतील स्वतःचे स्थान निर्माण करण्याची क्षमता वृध्दी.

५ समूह संघटनेतून कमीतकमी भांडवलातून गुणवत्ता प्रमाणित उत्पादने तयार करण्याची क्षमता वाढविणे.

६ काळाच्या गरजेनुसार मागणीप्रमाणे पुरवङ्गा देण्याची तयारी,

७ 'मार्केटींग' करणाऱ्या संस्थांची निवड,

८ जोपासना व विस्तार करण्याची तयारी.

९ स्वतःच्या ठिकाणापासून बाहेर पडण्याची तयारी.

१०.सतत शासन आणि योजनांवर अवलंबून न रहाता स्वावलंबी होण्यासाठी निर्णयांचे तंत्रज्ञानाची ओळख

११.तंत्रज्ञानाची व इंटरनेटचा वापर,

१२.जनसंपर्काची तयारी.

१३.केवळ प्रदर्शनांद्वारे नव्हे तर अन्य पर्यायांचा विक्री वाढविण्याच्या दृष्टीने शोध.


१४.नवनवीन उत्पादनांची निवड करणे, स्पर्धात्मक होणे.

१४.स्वतःच्या ''ब्रँडनेम'' ने बाजारपेठेत स्थिर होणे

१५.सातत्याने लहान - लहान औद्योगिक बाजारपेठ - यांचे प्रशिक्षण, 'क्रॅश कोर्स' करित रहाणे, यासंदर्भातील पुस्तके, प्रस्ताव वाचणे यामुळे आपण जे बचत गट अर्थकारणामध्ये स्थान निर्माण करण्यास मागे राहिले आहोत त्यास चालना मिळेल आणि आपली आर्थिक सत्ता आपण प्रस्थापित करु शकू.

-नीलिमा तपस्वी
असोशिएट मे. वर्ल्ड ट्रेडसेंटर मुंबई
व सल्लागार आर्थिक महिला धोरण
महाराष्ट्र राज्य

❒❒❒




# हे वाहतुकीचे नियम नव्हेत तर समाजात 'बाईने' कसं 'चालावं' हे सांगणारे 'संकेत' आहेत

समाज स्त्री-पुरुष दोघांचा, मग बाईलाच का नियम चाल चलनाचा?

आलोचना AALOCHANA

चुकीचं दिसलं तर...
हस्तक्षेप करा!!
काही चुकीचं दिसलं तर...
ेप करा!! हस्तक्षेप

काही चुकीचं दिसलं तर...

हस्तक्षेप करा!!

काही चुकीचं
दिसलं तर...
हस्तक्षेप करा!!
चुकीचं दिसलं तर... काही चुकीचं दिसलं
हस्तक्षेप करा!!